पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७६ ■ शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







# भाजप बंडखोर उमेदवाराला समर्थकांनी घरात कोंडले

## अर्ज मागे घेऊ नये म्हणून समर्थकांचा टोकाचा निर्णय

प्रतिनिधी २ जानेवारी

**नागपूर:** नागपुरातील भाजपचे बंडखोर उमेदवार किसन गावंडे हे या हायव्होल्टेज नाट्याचे केंद्रबिंदू ठरले आहेत. पक्षाकडून उमेदवारी मागे घेण्याचा दबाव वाढत असतानाच, गावंडे यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेत थेट त्यांच्या घरालाच कुलूप ठोकलं. गावंडे अर्ज माघारी घेण्यासाठी बाहेर पडू नयेत, यासाठी समर्थकांनी त्यांच्या घराला बाहेरून कुलूप लावून त्यांना आतच डांबून ठेवलं. या घटनेमुळे नागपुरात एकच खळबळ उडाली असून, राजकीय वर्तुळात या प्रकाराची जोरदार चर्चा सुरू आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा टोकाच्या घटनांनी राजकीय तणाव अधिकच वाढला होता. अखेर पोलिस आणि वरीष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांनी आता निर्णायक टप्प्यात प्रवेश केला असतानाच उमेदवारी न मिळालेल्या नाराज इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकावल्याने सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची डोकेदुखी वाढली आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत दुपारी ३ वाजेपर्यंत असल्याने, बंडखोर उमेदवारांना मनवण्यासाठी नेत्यांची धावपळ सुरू आहे. कुठे समजूत, कुठे दबाव, तर कुठे राजकीय तोडगे वापरले जात असताना नागपुरात मात्र राजकारणाला थेट थरारक वळण मिळाल्याचं पाहायला मिळालं. अर्ज माघारी घेऊ नये, यासाठी समर्थकांनी थेट भाजपच्या बंडखोर उमेदवारालाच घरात कोंडून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. समर्थकांनी पक्षावर गंभीर आरोप करत सांगितलं की, किसन गावंडे यांना सुरुवातीला पक्षाकडून अधिकृत एबी फॉर्म देण्यात आला होता. मात्र नंतर अचानक उमेदवारी मागे घेण्यास सांगितलं जात असून, त्यासाठी त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकला जात आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठीच समर्थकांनी टोकाचं पाऊल उचलल्याचं सांगण्यात येत आहे. त्यांच्या मते, हा भाग सातत्याने दुर्लक्षित राहिला असून, यापूर्वीही चारही उमेदवार इतर भागांतून देण्यात आले होते. त्यामुळे यंदा तरी या भागातून एक उमेदवार मिळावा, ही कार्यकर्त्यांची ठाम आणि रास्त मागणी आहे.

या संपूर्ण प्रकरणावर स्वतः किसन गावंडे यांनीही माध्यमांसमोर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितलं की, पक्षाने मला अधिकृत एबी फॉर्म दिला होता. मात्र आता अचानक उमेदवारी मागे घेण्यास सांगण्यात येत आहे. मी अर्ज मागे घेण्यासाठी जात होतो, पण माझ्या कार्यकर्त्यांनी घराला कुलूप लावून मला बाहेर जाण्यापासून रोखलं आहे. गावंडे यांच्या या विधानामुळे पक्षातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. उमेदवारी मिळाल्यानंतर ऐनवेळी माघार घेण्यास सांगणं हे अन्यायकारक असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असल्याचं यावरून स्पष्ट होत आहे.या नाट्यमय घटनेत भावनिक बाजूही समोर आली आहे. किसन गावंडे यांच्या आईने माध्यमांशी बोलताना, माझ्या मुलाला लढू द्या, अशी आर्त मागणी केली. एका आईने आपल्या मुलासाठी केलेली ही विनंती राजकारणाच्या कठोर वास्तवाला मानवी स्पर्श देणारी ठरली आहे.

### निवडणुकीतील वाढत्या अस्वस्थतेचं प्रतीक

अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर चित्र स्पष्ट होणार असलं तरी, नागपुरात घडलेला हा प्रकार महापालिका निवडणुकीतील वाढत्या अस्वस्थतेचं प्रतीक ठरत आहे. पक्षांतर्गत असंतोष, कार्यकर्त्यांची नाराजी आणि नेतृत्वावरील प्रश्न या सगळयांचा स्फोट निवडणुकीच्या तोंडावर होत असल्याचं दिसत आहे. किसन गावंडे अर्ज मागे घेणार की समर्थकांच्या आग्रहाखातर मैदानातच राहणार, याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. या निर्णयावर केवळ एका उमेदवाराचं नव्हे, तर संपूर्ण राजकीय समीकरणाचं भवितव्य अवलंबून असणार आहे.

### पतीची बंडखोरी, माजी महापौर गेल्या माहेरी

पतीच्या बंडखोरीमुळे नागपूरच्या माजी महापौर अर्चना डेहनकर माहेरी निघून गेल्या आहे. अर्चना डेहनकर यांचे पती विनायक यांनी बंडखोरी करत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे अर्चना यांनी आता भावाच्या घरी मुक्काम हलवल्याची माहिती आहे. माहेरी राहून भाजपचा प्रचार करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माजी महापौर अर्चना डेहनकर म्हणाल्या, पतीला अपक्ष फॉर्म भरु नका, असे सांगितले. पण त्यांनी अर्ज केला. पक्षासोबत राहिले पाहिजे असे म्हणने होते. राजकीय वाद टाळण्यासाठी मी हा निर्णय घेतल्याचे डेहनकर यांनी सांगितले. अर्चना डेहनकर या भारतीय जनता पक्षाच्या एक ज्येष्ठ नेत्या आहेत.

# प्रेयसीच्या कृत्याने प्रियकर रक्तबंबाळ

प्रतिनिधी २ जानेवारी

**मुंबई :** सांताक्रुझ पूर्व येथील कलिना परिसरात नववर्षाच्या रात्री एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. लग्नास नकार दिल्याच्या रागातून एका महिलेनं आपल्या प्रियकराचे भाजी कापण्याच्या चाकूने लिंग कापल्याची घटना समोर आली असून, या हल्ल्यात ४४ वर्षीय पुरुष गंभीर जखमी झाला आहे. जखमी अवस्थेत त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. या प्रकरणी वाकोला पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात गंभीर दुखापत केल्याप्रकरणी व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. जखमी व्यक्तीचे नाव जोगिंदर लखन महतो (वय ४४) असून ते जांभळीपाडा परिसरात राहत असून खासगी वाहनचालक म्हणून काम करतात. गेल्या १८ वर्षांपासून ते कुटुंबासह या भागात वास्तव्यास आहेत. पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, जोगिंदर यांचे त्यांच्या बहिणीच्या नणंदेसोबत म्हणजेच कंचनदेवी राकेश महतो (वय २५) हिच्यासोबत गेल्या सहा ते सात वर्षांपासून प्रेमसंबंध होते. कंचन ही जोगिंदरवर पत्नीला सोडून तिच्यासोबत राहण्याचा व लग्न करण्याचा दबाव टाकत होती. या कारणामुळे जोगिंदर यांच्या कुटुंबात वारंवार वाद होत होते. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने नोव्हेंबर महिन्यात जोगिंदर मुंबई सोडून बिहारला गेले होते. मात्र, त्या काळातही कंचन सतत फोन करून मुंबईत परत येऊन लग्न करण्याची धमकी देत असल्याचा आरोप जोगिंदर यांनी केला आहे. १९ डिसेंबर रोजी जोगिंदर पुन्हा मुंबईत परतले. मात्र, त्यांनी कंचनपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला होता.

# अकोल्यात विटेक्स 2026 चे थाटात उद्घाटन

## विदर्भातील औद्योगिक विकासामुळे रोजगाराच्या संधी वाढतील - गृह राज्यमंत्री पंकज भोयर

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री , अकोला यांच्या वतीने आयोजित विदर्भातील सर्वात मोठे व्यावसायिक प्रदर्शन 'विटेक्स२०२६' चा भव्य उद्घाटन समारंभ आज पार पडला. या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन सोहळ्याला खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, बी.सी. भरतीया यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी रविंद्र मानगावे, गोपीकिशन बाजोरीया, सुनिल इन्नाणी, विजय अग्रवाल, चंद्रकांत ठक्कर, शिवप्रकाश रुहाटीया, अशोक डालमिया, मनोज खंडेलवाल याची विशेष उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अध्यक्ष निकेश गुप्ता, सचिव निरव वोरा, सिध्दार्थ रुहाटिया, निखिल अग्रवाल, किशोर बाछुका, किरीट मंत्री, राहूल मित्तल, नितीन खंडेलवाल तसेच समस्त विटेक्स २०२६ ची आयोजन समिती या उदघाटन सोहळ्यात उपस्थित होती.



याप्रसंगी बोलताना ना. पंकज भोयर यांनी विदर्भातील औद्योगिक प्रगतीवर भाष्य केले. ते म्हणाले की, 'विटेक्स सारखी व्यासपीठे स्थानिक उद्योग आणि व्यापाराला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. अशा उपक्रमांमुळे विदर्भातील उद्योगांना चालना मिळेल, ज्यामुळे भविष्यात या भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तरुणांना स्थानिक पातळीवर काम मिळावे यासाठी शासन कटिबद्ध आहे.' असा विश्वास पंकज भोयर यांनी व्यक्त केला. हे प्रदर्शन गोरक्षण संस्थान मैदानावर भरवण्यात आले असून, यामध्ये विदर्भातील उत्पादन, किरकोळ विक्री , आणि सेवा क्षेत्रातील विविध दालने लावण्यात आली आहेत. 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पनेवर आधारित सेमिनार्सद्वारे व्यापाऱ्यांना मार्गदर्शनही केले जाणार आहे. या प्रदर्शनामुळे अकोला आणि संपूर्ण विदर्भातील व्यापारी वर्गात उत्साहाचे वातावरण असून, औद्योगिक विकासाला नवी गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.






# पुण्याहून धावणार ६० नवीन रेल्वे !

**पुणे :** पुणे स्थानकावरील फलाटांची लांबी वाढविण्यासोबतच सहा नवीन फलाटांचे काम केले जाणार आहे. यामुळे पुणे स्थानकाची प्रवासी हाताळण्याची क्षमता दुप्पट होईल. सध्या पुणे स्थानकावरून प्रवास सुरू करणाऱ्या (ओरिजनेटिंग) रेल्वे गाड्यांची संख्या ५० आहे, पाच वर्षांत ही संख्या ६० ने वाढवून ११० होणार आहे. सध्या पुणे स्थानकावरून प्रवास सुरू करणाऱ्या (ओरिजनेटिंग) रेल्वे गाड्यांची संख्या ५० आहे, पाच वर्षांत ही संख्या ६० ने वाढवून ११० होणार आहे.




जाहिरात संकलनः- शारिक कुरेशी
सिटी न्यूज ता.प्रतिनिधी मुर्तिजापूर मो. ९७३०००३९४०






## सहकार व्यवस्थापन पदविकेसाठी प्रवेश सुरू

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमासाठी अमरावती येथील भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे दि. १ जानेवारी ते ३१ जुन २०२६ या मुदतीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दि. १ ते ३० जानेवारी २०२६ या दरम्यान प्रवेश देण्यात येणार आहे. सहकार विभागाने सहकारी संस्थांमध्ये काम कारणाऱ्या कर्मचाऱ्यास सहकारी व्यवस्थापन पदविका अनिवार्य केले आहे. त्यामुळे राज्यातील सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कामकाज सांभाळून हा अभ्यासक्रम दुरूस्थ शिक्षण पद्धतीने पुर्ण करता यावा, तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना सहकार क्षेत्रातील विविध सहकारी संस्थामध्ये सदर पदविका अभ्यासक्रमामुळे नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने १३ सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हा अभ्यासक्रम पोस्टल पद्धतीने सुरू केला आहे.

# मेरा युवा भारततर्फे तालुकास्तरीय खेळ स्पर्धा





प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** मेरा युवा भारत आणि नांदगाव खंडेश्वर जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने नांदगाव खंडेश्वर येथे विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष भूपेंद्र जेवडे, तालुका वकील संघ उपाध्यक्ष मोहन जाधव, शीतल काळे उपस्थित होते.

यात कबड्डी, खो-खो, १०० मीटर मुलांचे धावणे, गोळाफेक, १०० मीटर मुलींची धावणे, खो-खो या स्पर्धेत विजेता संघाला प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक, तसेच वैयक्तिक खेळाडूंना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पारितोषिक म्हणून मेरा युवा भारत अमरावती, युवा कार्यक्रम विभाग युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार ही ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धा मेरा युवा भारतच्या जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूपेंद्र जेवडे यांनी आयोजित केल्या. स्पर्धेसाठी जन स्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्यांनी पुढाकार घेतला.

## तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थांसाठी विशेष कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी २ जानेवारी



**अमरावती:** भावी पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी आणि जिल्हा तंबाखूमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या तालुकास्तरीय पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी 'तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था' कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने 'तंबाखू मुक्त पिढी : शाळांसाठी आव्हान' या विषयाच्या अनुषंगाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये उपशिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण, शाळा केंद्र प्रमुख आणि विषय साधन व्यक्ती उपस्थित होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वापराच्या दुष्परिणामांबाबत समाजात आणि विशेषतः लहान मुलांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी शासन स्तरावर निरंतर प्रयत्न सुरू आहेत. ज्यामध्ये शाळा आणि शैक्षणिक संस्था केंद्र व राज्य शासनाच्या निकषांनुसार तंबाखूमुक्त करण्यासाठी रॅली, पोस्टर, घोषवाक्ये, कविता आणि पथनाट्ये यांसारखे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्री करणे हा दंडात्मक गुन्हा असून १८ वर्षाखालील मुलांना तंबाखू विकणे किंवा तसे करण्यास भाग पाडणे हा कठोर शिक्षेस पात्र गुन्हा आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती अंतर्गत प्रत्येक तालुक्यातील शाळांकरिता विशेष पोस्टर्स, बॅनर्स आणि बोर्ड्सचे वाटप करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षक डॉ. मंगेश गुजर यांनी केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकषांची माहिती दिली, तर मंगेश गायकवाड यांनी 'तंबाखू नियंत्रण कायदा २००३' बाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेत शिक्षण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, संभाजी नगर यांनी संयुक्त सहभाग नोंदवला असून, कार्यशाळेतील प्रशिक्षित अधिकारी आता शाळा स्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांना मार्गदर्शन व पर्यवेक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे 16 शिलेदार मैदानात

♦ मित्र पक्षांकडून १६ उमेदवारांना संधी ♦ एकूण ३२ उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व मित्रपक्षाकडू निवडणुकीच्या रिंगणात एकूण ३२ उमेदवार उतरले आहे. त्यापैकी १६ उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तर १६ उमेदवार मित्र पक्षाकडून निवडणूक रिंगणात उभे आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक एक गजानन किसनराव राऊत( ड ),प्रभाग क्रमांक तीन आसिफ खान रशीद खान(ड),प्रभाग क्रमांक चार शाहिदा बानो सय्यद महसूद(क), प्रभाग क्रमांक आठ नितीन नथुजी राऊत (ड),प्रभात क्रमांक नऊ तेजश्री संजय वानखडे (अ), प्रभाग क्रमांक दहा राहुल लक्ष्मणराव मोहोड (ड ),प्रभाग क्रमांक ११ संजीवनी प्रफुल्ल डोंगरे (अ),प्रभाग क्रमांक १२ राजेंद्र देविदास माहुरे( अ ),प्रभाग क्रमांक १३ विशाल लक्ष्मणराव बोरखडे( ड),अर्चना लक्ष्मीनारायण यादव (ब) तर प्रभाग क्रमांक १६ मधून अरबाज खान समी खान( क )व शेख फारुक शेख अहमद (ड),प्रभाग क्रमांक १७ मधून माधुरी विलासराव काळसरपे( क )व दिलीप जानरावजी वऱ्हाडे (ड), प्रभाग क्रमांक १८ मधून भावना राहुल उरकुडे( क) आणि प्रभाग क्रमांक २० मधून कृतिका रोशन कडू (क )यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांनी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक भारतीय, कम्युनिस्ट पक्ष, रिपाई गवई गट तसेच समाजवादी पार्टी यांच्यासोबत आघाडी केली आहे. त्यामुळे मनपा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्र पक्षातर्फे जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांनी विरोधकांसमोर तगडे आव्हान उभे केले आहे. या निवडणुकीमध्ये ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक तर्फे प्रभाग क्रमांक तीन नवसारी येथून डॉ महाफुज खालीद(ब ),जयश्रीताई कुबडे( क )आणि ?ड.शुमाईल खान(ड),प्रभाग क्रमांक पाच मधून गोपाल मिलिंद ढेकेकर(अ), प्रभाग क्रमांक दहा मधून भारती सुरेंद्र गुडधे(अ), प्रभाग क्रमांक १२ मधून धर्मराज इत्तूजी सारवान( अ )तर प्रभाग क्रमांक १९ मधून रामकृष्ण अडकुजी महाजन (ड) यांना उमेदवारी दिली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे प्रभाग क्रमांक १० मधून प्रतिभा दिनेश मेश्राम (अ),संतोष बळीराम राऊत (क)आणि प्रभाग क्रमांक १७ मधून गणेश रामभाऊ भगत (ड )यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच रिपाई गवई गटाकडून प्रभाग क्रमांक दोन दिनेश धाकडे (ड),नरेंद्र गुळदेकर(अ), प्रभाग क्रमांक तीन मधून रचना मकेश्वर(अ), प्रभाग क्रमांक सहा मधून संजय बाळकृष्ण भोवते (ड) आणि प्रभाग क्रमांक १९ मधून सुमन सूर्यवंशी (क) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यासोबतच समाजवादी पार्टीतर्फे प्रभाग क्रमांक चार मधून रिजवान अहमद अब्दुल फाईम (ब), अजाज अहमद अब्दुल रज्झाक (अ), प्रभाग क्रमांक आठ मधून राजन बचेल ( ब ),प्रभाग क्रमांक १५ मधून शकीला बी मोहम्मद खान(क), प्रभाग क्रमांक २१ मधून अब्दुल आतिफ अब्दुल रफिक(ब) व आणि तन्वीर अहमद खान नसीम खान(क) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांना पक्षातर्फे अधिकृत उमेदवारी देण्यात आल्याचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार व मित्र पक्षाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, डॉ. राजेंद्र गवई, बाळासाहेब कोराटे, सुनील घटाळे व ॲड.जिया खान यांनी दिली आहे.

## आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** जिल्ह्यातील रिक्त ठिकाणी आधार नोंदणी केंद्रांचे वाटपाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती मार्फत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता प्राप्त व सुरू असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीची तारीख दि. ३१ डिसेंबर २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ ही आहे. वलगांव, तालुका अमरावती-१, आसरा, तालुका भातकुली-१, मंगरूळ चव्हाळा, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, लोणी, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, घुईखेड, तालुका चांदुर रेल्वे-१, जुना धामणगांव, तालुका धामणगाव-१, वऱ्हा, तालुका तिवसा-१, हिवरखेड, तालुका मोर्शी-१, लोणी, तालुका वरूड-१, पुसला, ता. वरूड-१, बेलोरा, ता. चांदुर बाजार-१, रासेगांव, ता. अचलपूर-१, वडनेर गंगाई, ता. चिखलदरा-१, असे एकुण १८ नवीन आधार केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

## 'नववर्ष प्रण - सुरक्षित अन्न' विशेष तपासणी मोहीम सुरू

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ आणि भेसळमुक्त अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत जिल्ह्यात 'नववर्ष प्रण - सुरक्षित अन्न' विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे विशेष अभियान २४ डिसेंबरपासून सुरू झाले असून १० जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील हॉटेल, उपहारगृहे, क्लब हाऊस आणि रिसॉर्ट्स इत्यादी आस्थापनांची कसून तपासणी केली जाणार आहे. तपासणीसोबतच संबंधित आस्थापना चालकांसाठी सुरक्षित अन्नाबाबतच्या सवयी आणि नियमांबाबत सभा व कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि भेसळमुक्त अन्न मिळावे, यासाठी सर्व अन्न व्यावसायिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन कार्यालयाने केले आहे. या मोहिमेमुळे खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचे विशेष लक्ष राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवली जाणार आहे.

# एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेचे रविवारी आयोजन

♦ १२ हजारहून अधिक उमेदवार देणार परीक्षा

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ येत्या रविवारी, ४ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. या परीक्षेसाठी प्रशासनाने तयारी केली आहे.

ही परीक्षा रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या एकाच सत्रात पार पडेल. अमरावती शहरामध्ये परीक्षेसाठी एकूण ४१ परीक्षा उपकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षेसाठी एकूण १२ हजार ८६४ उमेदवार प्रविष्ट होणार आहेत. परीक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण १ हजार २५० अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासनाकडून परीक्षेचे नियोजन पूर्ण झाले असून उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## राज्यस्तरीय आदिवासी आश्रमशाळा क्रीडा स्पर्धांचे ५ ते ७ जानेवारी दरम्यान आयोजन

**अमरावती:** सन २०२५-२६ या वर्षातील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय, अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती विभागामार्फत करण्यात येणार आहे. ही क्रीडा स्पर्धा दि. ५, ६ व ७ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भात या कार्यालयाच्या स्तरावरून विविध समित्या गठीत करण्यात आल्या असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी दिली आहे.

## कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये आदेश जारी

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती:** जिल्ह्यात ३० डिसेंबर रोजी महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने तसेच नामांकन पत्र दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्यादिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवार नामांकन पत्र दाखल करण्याची शक्यता आहे. अशावेळी सभांचे आयोजन व मिरवणूक काढण्यात येतात. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आली आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. १० जानेवारी २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये आदेश जारी करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करण्याचेआदेश पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी निर्गमित केला आहे. रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा आयुक्तांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी २ जानेवारी

**अमरावती :** पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार दिनांक ३१.१२.२०२५ रोजी गजानन इंगळे पोउपनिरी नियंत्रण कक्ष, प्रेमदास मोहोड सपोउपनिरी/१००६ डॉम युनिट, रेखा निर्गुळे मपोहवा/१०८१ पो.स्टे. कोतवाली यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आज दिनांक ३१.१२.२०२५ रोजी पोलीस आयुक्त कार्यलयाचे मिटींग हॉल येथे आयोजित करण्यात आला.

. पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे हस्ते पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र व स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र, सेवा नि. अंमलदार यांचे पत्नीस साडी व कुंडीतील रोपटे देवुन कौटुंबिक वातावरणात सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अनुभवाचा लाभ भविष्यातही पोलीस विभागास मिळत राहणार अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांचे पुढील भविष्यात सुदृढ आरोग्यकरिता कुटुंबप्रमुख या नात्याने मा. पोलीस आयुक्त यांनी शुभेच्छा दिल्या व निवृत्तीनंतर मिळणारे पैशांची गुंतवणुकीपुर्वी विश्वासार्हता तपासुनव नियोजन करावे. तसेच सेवानिवृत्ती काळात त्यांचे शासकीय सुविधेबाबत काही अडचण असल्यास संपर्क करणेबाबत सुचीत केले. सदर कार्यक्रमाकरिता शाम घुगे पोलीस उपायुक्त परि-०२, गणेश शिंदे , पोलीस उपायुक्त, परि-०१, . रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, तसेच प्रशासकीय अधिकारी श्रीमती सविता ठेवले व सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कुटुंबिय तसेच अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात घारोड ग्रा. पं. चा उकृष्ट सहभाग

प्रतिनिधी २ जानेवारी



**खामगाव :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत घारोड ग्रामपंचायत सक्रिय सहभाग घेत असून अभियानातील विविध उपक्रमांना प्रतिसाद देत; उत्कृष्ट कामगिरी बजावत आहे.

या अभियानामध्ये दिनांक ३० डिसेंबर रोजी विविध उपक्रम ग्रामपंचायत कडून घेण्यात आले असून यामध्ये ३५ महिला बचत गटांना उमेद अभियानांतर्गत समुदाय गुंतवणूक निधीचे वाटप करण्यात आले. मराठी पूर्व उच्च प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी घारोड ग्रा. पं. चे सरपंच वैभव ठाकरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र शाखा खामगाव जि शाखा व्यवस्थापक श्री. मिरगे साहेब, उमेद अभियानाच्या शाखा व्यवस्थापक अनिता सोळंके, दीपक शेळके, उपसरपंच सौ. सरिता दांदडे, ग्रा. पं. अधिकारी दीपक नेमाने, ग्रा.पं. सदस्य अश्विनी परकाळे, मंजुळा इंगोले, जनार्दन कड, भगवान बोरे, अक्षय माथनकार, अनिल गवई आदि. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या नवीन वर्ग खोलीचे सरपंच मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले, त्याचबरोबर शासनाकडून मराठी पूर्व उच्च प्राथमिक शाळेला देण्यात आलेल्या ४.५० लक्ष रुपये किमतीच्या एलईडी टीव्ही तसेच १० कॉम्प्युटर संच याची सुद्धा लोकार्पण करण्यात आले. सर्वप्रथम मान्यवरांनी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी सरपंच ठाकरे यांनी भविष्यात महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपाय योजना ग्रामपंचायतीकडून करण्यात येणार असल्याची ग्वाही बोलताना दिली. या कार्यक्रमासाठी सचिन गायकवाड, शेख अब्दुल, राहुल परकाळे, शेख फैयाज, संजू गायकवाड, शिक्षक साहेबराव हिवराळे, सुरेश राऊत, उमेद सिआरपी सुलोचना इंगोले, शारदा दंदळे, आदींनी परिश्रम घेतले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये ही ग्रामपंचायत विविध उपक्रम राबवत आहे.

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० वाहनधारकांवर कारवाई

प्रतिनिधी २ जानेवारी

**खामगाव :** नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खामगाव उपविभागात पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत ड्रंक अँड ड्राईव्हसह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर कडक कारवाई करण्यात आली. उपविभागातील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण २० वाहनधारकांवर कारवाई करण्यात आली आहे. ही विशेष मोहीम जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. नीलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत पार पडली. उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली खामगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रामकृष्ण पवार, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेंद्र अहिरकर यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष पथक या मोहिमेत सहभागी झाले होते. मद्यप्राशन करून वाहन चालवणे, हेल्मेट न वापरणे, वेगमर्यादा ओलांडणे, ट्रिपलसीट वाहन चालविणाऱ्या वाहनधारकांवर नाकाबंदी करून तपासणी करण्यात आली.

## खामगाव न.प. मध्ये भाजपाचा गट स्थापन



प्रतिनिधी २ जानेवारी

**खामगाव:** न.प. निवडणूक निकालानंतर गटनेत्याची निवड करणे अनिवार्य आहे. त्यामुळे स्थानिक न.प. मध्ये भाजपाने गट नेत्याची निवड केली असून सर्वानुमते विजय उगले यांची निवड करण्यात आली आहे. तर १ जानेवारी रोजी त्यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी यांच्यासमोर भाजपाच्या नगराध्यक्षासह नगरसेवकांनी हजर हावून गटस्थापन केला आहे. नगरपालिका निवडणूक निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला आहे. यामध्ये भाजपाच्या कमळ निशाणीवर नगराध्यक्षासह २९ जण निवडून आले आहे. १ नगरसेवक भाजपा पुरस्कृत अपक्ष आहे. त्यामुळे नगराध्यक्षासह भाजपाचे पक्षीय बलाबल ३० वर पोहचले आहे. या ३० जणांचा गट स्थापन करण्यासाठी १ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपस्थित होवून पत्र दिले आहे.त्यानुसार गटस्थापन झाला आहे. यामध्ये गटनेतेपदी विजय उगले यांची निवड करण्यात आली आहे. व त्यांच्याच सहीने गट स्थापन करण्यात आला आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. अर्पणा फुंडकर व भाजपाचे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

## गट ब संयुक्त सेवा पूर्वपरीक्षा २१ केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला:** महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त सेवा पूर्व परीक्षा-२०२५ जिल्ह्यात २१ उपकेंद्रांवर दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दु. १२ या वेळेत होणार आहे. त्यानुसार या केंद्रांवर दि. ४ जानेवारीस सकाळी ६ ते सायं. ८ दरम्यान १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबत आदेश जारी केला.

केंद्रावर पाचहून अधिक व्यक्तींनी एकत्रित प्रवेश करू नये, झेरॉक्स सेंटर, पानपट्टी आदी बंद ठेवावे. मोबाईल, लॅपटॉप, इंटरनेट साधने वापरास मनाई आहे. अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाही.

## राजेश्वर कॉन्व्हेंटचे स्नेहसंम्मेलन जागर उत्सव महाराष्ट्राचा उत्साहात



प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** जीवन विकास ज्ञान प्रसारक मंडळ संचालित जुन्या शहरातील राजेश्वर कॉन्व्हेंटचे स्नेहसंम्मेलन उत्साहात संपन्न झाले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक अनिल कोल्हे, वेतन अधिक्षक शिक्षण विभाग माध्यमिक, अकोला यांनी भुषविले तर प्रमुख पाहुणे म्हणुन सुरज गोळे, कार्यक्रम अधिकारी आकाशवाणी अकोला, गोपाल उगले सरपंच ग्राम पंचायत कळंब, ता. बाळापूर जि. अकोला, माजी.जि.प.अध्यक्ष अकोला बालमुकुंद भिरड लाभले होते. तसेच मंचावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत मेहरे, अध्यक्ष नंदकिशोर मेहरे, सचिव वैभव मेहरे, संचालक दिपक इचे, डायरेक्टर कांचन पटोकार, सौ. प्रियंका मेहरे, सौ. चेतना मेहरे, बालसमुपदेशक डॉ. प्रदिप अवचार, मुख्याध्यापिका सौ. सरिता वरणकर उपस्थित होते.

## आज महानगरात शाकंभरी प्राकट्य उत्सव

**अकोला:** येथील स्थानिक



शक्तिधाम सेवा समितीच्या वतीने दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता गीता नगर येथील शक्तिधामच्या प्रांगणात भव्य शाकंभरी प्राकट्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात काशीहून पधारलेल्या पुजाऱ्यांमार्फत भव्य गंगा आरती सोहळा संपन्न होणार आहे. या पावन उत्सवात उत्तर प्रदेशातील नानपारा धाम येथील प्रसिद्ध मंगलपाठ गायक श्रीकुमार शानू माताजी यांचा भव्य संगीतमय मंगलपाठाचा कार्यक्रम होणार आहे. उत्सवादरम्यान शाकंभरी मातेंचा भव्य दरबार, झांकी दर्शन, दिव्य ज्योत दर्शन, चुनरी उत्सव, ध्वज उत्सव, गजरा उत्सव, छप्पन भोग दर्शन तसेच फुलांची होळी यांचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः काशीच्या भक्तिमय परंपरेनुसार गंगा आरतीचे आयोजन करण्यात येणार असून, मुख्य यजमान म्हणून मनोज कृष्णकुमार सुरेका व त्यांचे कुटुंब उपस्थित राहणार आहेत.

# भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सदस्यांचा पदग्रहण सोहळा

प्रतिनिधी २ जानेवारी



**तेल्हारा:** १ जानेवारी रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्षा तथा नगरसेवक/नगरसेविका यांच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे, खासदार अनुप धोत्रे, जिल्हा अध्यक्ष संतोष शिवरकर, महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष जयश्रीताई पुंडकर, गजानन उंबरकार जिल्हा उपाध्यक्ष, डॉ.संजय शर्मा, गणेश रोठे, गोपाल मोहोड, योगेश गोतमारे, दयाल बलोदे, मुलचंद राठी, अनिल पोहने, रुपेश राठी, प्रा.सुधाकर येवले, ताराचंद पालिवाल, कुलदीप तराळे, रामेश्वर हागे, लखन बगाडे, महिला आघाडी अध्यक्षा मोनिकाताई वाघ, सिध्दार्थ रुहाटिया, उमेश राठी यांची उपस्थितीत होती.

नगराध्यक्षा वैशालीताई पालिवाल, हिवरखेड नगर परिषद अध्यक्षा सौ.सुलभाताई दुतोंडे, नगर सेवक सतीश जयस्वाल, सौ.अरुणाताई ठाकरे, नगरसेवा समितीचे विजयसिंह बलोदे, गटनेते अतुल विखे, साक्षीताई वानखडे (पांडव), अमित अग्रवाल, भक्तीताई छांगाणी, जितेंद्र राठी, गायत्रीताई सोळंके, संध्याताई गावत्रे, रूपेश चव्हाण, रुपालीताई हागे, जयाताई बघ्घन, प्रवीण ढोके यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी युवा मोर्चा, महिला आघाडी, नगर सेवा समितीचे कार्यकर्ते, शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# सुफलदास महाराज आश्रमात कार्यक्रम

प्रतिनिधी २ जानेवारी

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील देवस्थान गुरुभोलेनाथ आश्रम पिवशी - पांढरी महंत सुफलदास महाराज संस्थानात श्री श्री १००८ महंत खडेश्री महाराज यांच्या भक्तांच्या वतीने आयोजित नवीनवर्षा निमित्त १ जानेवारी रोजी गणमान्य नागरिकांच्या उपस्थितीत स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.

दरवर्षी नवीन वर्ष सर्वांना सुखसमृद्धी, आनंद व भरभराटी चे जावो म्हणून महंत केशवदासजी त्यागी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते यावेळी बाळासाहेब गणोरकर यांनी सर्वप्रथम श्री श्री १००८ तपस्वी महंत सुफलदास महाराज यांच्या समाधी मूर्तीची पूजा आरती केली.

पंचक्रोशीतील भाविक श्रध्देपोटी नवसाळ फाट्यानजीक अकोला -अमरावती राष्ट्रीय महामार्गापासून ६ किमी अंतरावर उत्तरेस असलेल्या श्री श्री १००८ तपस्वी महंत सुफलदास महाराज यांच्या समाधी दर्शनासाठी जातात. येथील सुंदर अशा नैसर्गिक वनसंपदेत वसलेले हे मंदिर एक अप्रतिम देवस्थान आहे या आश्रमात शांत व मनमोहक नैसर्गिक वातावरण आहे. येथील निरनिराळ्या जातीचे पशू पक्षी भक्तगणांना



आकर्षित करतात. दरवर्षी श्रावण महिन्यात, महाशिवरात्री , रामनवमी, हनुमान जयंती, सुफलदास महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला भक्तगण मोठ्या संख्येने संयुक्तरीत्या सर्व देवीदेवतांचे पूजन करण्यासाठी येतात. जंगलातुन व नदीनाल्यातून वाट काढीत जाणाऱ्या या आश्रमाकडे लोकप्रतिनिधीसह शासन प्रशासनाने लक्ष्य घालून पर्यटनाच्या दृष्टिकोनातून काम करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# रेती माफियांवर महसूल विभागाचा हल्लाबोल!

वि. प्रतिनिधी २ जानेवारी

### ◆ अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त




**अकोट:** तालुक्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कडक भूमिका घेतली असून, दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत श्प् २७ ँ ४०४६ क्रमांकाचा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला झालेल्या या कारवाईमुळे रेती माफियांना चांगलीच चपराक बसली आहे.

ही कारवाई नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नरेंद्र सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्या समवेत मंडळ अधिकारी गणेश भारती, ग्राम महसूल अधिकारी गोपाल वानरे (अकोट भाग क्र. १ व २) तसेच रितेश मेंढे (मुळा मोहाळा) यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

सदर ट्रॅक्टर कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अवैधरीत्या रेतीची वाहतूक करत असल्याचे आढळून येताच, महसूल पथकाने तात्काळ हस्तक्षेप करत ट्रॅक्टर जप्त केला. या प्रकरणी संबंधितांवर पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.

महसूल विभागाच्या या तत्पर, निर्भीड आणि ठोस कारवाईमुळे अवैध रेती तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे. भविष्यातही अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने राबवण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# शेख इमरान यांनी दिली शेवटपर्यंत शर्तीची लढत!

प्रतिनिधी २ जानेवारी

### ◆ भाजपाचे २५ तर वंचितचे १६ उमेदवार होते रिंगणात

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर नगरपालिका नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शेवटच्या क्षणापर्यंत लढत देणारे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख इमरान यांची शहरभर चर्चाच सुरू आहे. कारण साधे आहे, देशातील बलाढ्य पक्षाला जबरदस्त टक्कर देणे ही एखाद्या साध्या कार्यकर्त्याची गोष्ट नव्हे. त्यामुळे ङ्घहरला तरी जिंकलाङ्ग अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त होताना दिसते.

शेख इमरान शेख खलील यांनी सुमारे दहा-पंधरा वर्षांपूर्वी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत राजकारणात प्रवेश केला. वडिलांच्या निधनानंतर कमी वयातच घराची धुरा त्यांच्या खांद्यावर आली. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी राजकारणात सक्रिय भूमिका निभावत स्वतःचे वेगळे असे स्थान निर्माण केले.

निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात होणार होती, त्याचवेळी



इमरान यांच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या एकुलत्या एक जावयाचे अल्पशा आजाराने निधन झाले. घरात शोककळा असतानाही, काही दिवसांनी स्वतःला सावरून इमरान पुन्हा प्रचाराच्या मैदानात उतरले. मोठा गाजावाजा किंवा आक्रमक शोभायात्रा न करता, काही विश्वासू कार्यकर्त्यांच्या जोरावर त्यांनी जनसंपर्क मोहीम राबवली. काही घटकांकडून त्यांना अपेक्षित पाठबळ न मिळाल्याची खंत त्यांनी निकालानंतर बोलून दाखवली.

निकालाच्या दिवशी प्रभाग १ ते ११ पर्यंत इमरान यांनी भाजपच्या उमेदवाराला जोरदार टक्कर दिली. सुरुवातीला त्यांना तिसऱ्या क्रमांकावर मानले जात होते, परंतु मोजणी जसजशी पुढे सरकत गेली तसतसे लोकांना निवडून येण्याची अपेक्षा वाढत गेली. इमरान यांचा हा प्रवास ङ्घअचंबित करणाराङ्ग ठरल्याचे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. आपल्या वडिलांच्या कार्याचा वारसा आणि स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी संपूर्ण शहर पिंजून काढले , त्यामुळे निवडणूक अतिशय टोकाची होणार हे आधीच स्पष्ट झाले होते. परंतु १२ व्या प्रभागात भाजपच्या उमेदवाराला निर्णायक लीड मिळाली आणि अंतिम निकाल भाजपच्या बाजूने गेला. तरीसुद्धा, इमरान यांनी दिलेली लढत शहरात चर्चेचा विषय ठरली. नगराध्यक्ष पदासाठी नवखा उमेदवार असल्यामुळे सुरुवातीला त्यांच्याबद्दल मोठी चर्चा नव्हती; परंतु निकालाच्या दिवशी प्रत्येक फेरीत ते वाढत चाललेल्या मतांनी अनेकांच्या नजरा त्यांच्याकडे खिळवून ठेवल्या. समाजाच्या समाजकंटकाच्या विरोध आणि उलट सुलट भूमिका मांडणाऱ्या लोकांमुळे हा पराभव झाला आहे. भाजपाने या निवडणुकीमध्ये २५ उमेदवार तर वंचितने शहरात १६ जणांना उमेदवारी दिली असून याच्यात सुद्धा मोठा फरक दिसून येत आहे. नामांकित उमेदवारांच्या रांगेत स्वतःची वेगळी छाप निर्माण करत शेख इमरान यांनी या निवडणुकीत जरी विजय मिळवला नसला, तरी शहराच्या राजकीय पटावर 'इमरान' हे नाव ठळकपणे उमटवले, अशी प्रतिक्रिया शहरभर उमटताना दिसते.

**गाव सोडणार म्हणणाऱ्यांची बोलती बंद!**

नगरपरिषद निवडणूक मध्ये त्याला कोणी ओळखत नाही, त्याचा काही वजन नाही, या निवडणुकीमध्ये जर शे इमरान यांनी एका हजाराच्या वर मत घेतले तर गाव सोडून देणार, असे बोलणारे कधी गाव सोडणार, याकडे लक्ष वेधत आहेत.

# शौर्य दिना निमित्त रक्तदान शिबिर

प्रतिनिधी २ जानेवारी

**हिवरखेड:** ग्राम सौंदळा येथे सचिन वाघ मित्रपरिवार व भीम नवयुवक मंडळ सौंदळाच्या वतीने रक्तदान शिबिराला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रथम महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.




प्रमुख पाहुणे सरपंच विनोद मिरगे, रवींद्र दामधर, सचिन वाघ, सदानंद खंडेराव, मिलिंद दामोदर, सुभाष रौंदळे, निलेश खंडेराव, राहुल खंडेराव, सुमेध शिरसाट , प्रवीण वाहूरवाघ , शुधोधन खंडेराव, डॉ.प्रशांत इंगळे, संतोष बाबुळकर, अरुण शित्रे ,नागेश बांगर , संजय हिवराळे, सुरेंद्र राहणे नवलकुमार अरबट , पूजा वाघ, अन्नपूर्णा दामोदर, बेबी वाघ, सुरेश राहणे विनोद धांडे, योगेश खंडेराव, राहुल शिरसाट, मंगेश खंडेराव, अमोल राहणे, निलेश निळे, अश्विनी वाघ, गजानन पांडे, विलास घुंगड यांचे सहकार्य लाभले. ठाकरे रक्तपेढी अकोलाला रक्त देण्यात आले.

# 'त्या' पोलिस कर्मच्याऱ्यांची कारागृहात रवानगी!

**कुटासा :** ५० हजार रुपयांच्या लाचखोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी दहिहांडा पोलिस ठाण्यात कार्यरत एएसआय भागवत कांबळे यांचा रायटर विनोद खेडकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी दुपारनंतर न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर खेडकर याची कारागृहात रवानगी करण्यात आली. १६ जुलै २०१५ रोजी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एएसआय कांबळे यांना अटक केली होती. तपासादरम्यान पोलिस अंमलदार विनोद आनंदराव खेडकर (५१), दहीहांडा पोलिस ठाणे यांच्यावरही कलम वाढवून गुन्हा दाखल करण्यात आला.

# विभागीय स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धांचा समारोप

प्रतिनिधी २ जानेवारी

### ◆ मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे वितरीत



**अकोला:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासकीय निवासी शाळांतील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धांचे बक्षीसवितरण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनात झाले. पाचही जिल्ह्यांतून सुमारे ७५० विद्यार्थी संमेलनात सहभागी झाले.

जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी विनोद गवळी, समाजकल्याण सहायक आयुक्त मारोती वाठ, सहायक आयुक्त पीयुष चव्हाण, निवासी शाळा विशेष अधिकारी सचिन मोरे, रेखा ठाकरे, जनसंपर्क अधिकारी मंगला देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

अमरावती विभागातील मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळांतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच क्रीडा नैपुण्य विकसित होण्यासाठी हे संमेलन घेण्यात आले. बहुविविध सांस्कृतिक कलाप्रकारांबरोबरच सांघिक व वैयक्तिक मैदानी खेळ स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यात बुलडाणा जिल्ह्याने चॅम्पियनशिप अवॉर्ड मिळवला.

प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्या अध्यक्षतेत मंगळवारी संमेलनाचा शुभारंभ झाला. प्रमुख अतिथी म्हणून समाजकल्याण सहाय्यक आयुक्त एम.जी.वाठ, यवतमाळच्या मंगला मून, वाशिमचे पियुष चव्हाण, बुलडाण्याचे मनोज मेरत व अमरावतीचे राजेंद्र जाधवर यांच्यासह बहुजन कल्याण अधिकारी अभिजित काळे, समाजकल्याण अधिकारी सरिता बोबडे, गोपाळराव वाघमारे आदी उपस्थित होते. समारोपप्रसंगी श्री. भट, श्री. पवार, श्री. गवळी यांनी मनोगत व्यक्त करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. नितीन इंगळे, आम्रपाली घनबहादूर यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. नितीन इंगळे व आम्रपाली घनबहादूर यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. उमेश वाघ, शैलेश कुलकर्णी, संतोष पद्मने यांनी परिश्रम घेतले.

# नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी : सनातन संस्कृती महासंघ

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** मानव, पशुपक्षी आणि पर्यावरणासाठी घातक असलेल्या नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी या आशयाचे निवेदन सनातन संस्कृती महासंघातर्फे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

बंदी असलेल्या नायलॉन मांजाची बेसुमार विक्री आणि वापर रोखण्यात प्रशासन अपयशी ठरल्याबद्दल तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वारंवार आदेश देऊनही कोणताही सकारात्मक परिणाम न मिळाल्याने न्यायालयाने आता आदेशा द्वारा थेट कठोर दंडात्मक कारवाईचे संकेत दिले आहेत. नायलॉन मांजाचे पुरवठादार आणि विक्रेता यांना २.५ लाख रुपये दंड तर नायलॉन मांजा वापरताना आढळलेल्या सज्ञान व्यक्तीला तसेच अल्पवयीन मुलांच्या पालकांना ५०००० रुपये दंड प्रस्तावीत केला आहे. नायलॉन मांजा संबंधित जनहित याचिका न्यायालयाने स्वतःहून दाखल केली आहे.

नागरिक, पशुपक्षी यांच्या जिविताचे तसेच पर्यावरणाच्या रक्षणाच्या दृष्टीने, नायलॉन मांजाचे विक्रेते तसेच मांजाचा वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली आहे. निवेदन देण्यासाठी महासंघाचे हेमंत जकाते, नरेंद्र कराळे, मनोज अग्रवाल, हेमल खिलोसीया, सुबोध देशमुख, महेश शाह, पंकज सिधारा, मोहीत नायसे, अभिजित कराळे, ऋषीकेश जकाते आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**
**ई-निविदा सुचना ३१/२०२५-२०२६**
**जावक क्रमांक ९३७७/ईनिसु-३१ निलि/२०२५/दिनांक २४.१२.२०२५**

email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No0724-2435195

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र. १ ते ८ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नांव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | मौजे राहेर येथील ग्राम पंचायत जवळ सभामंडपाचे बांधकाम करणे ता. पातूर | २०७०९५३ | पात्र |
| २ | विश्रामगृह बाळापूर ता. बाळापूर जि. अकोला येथे वृक्षारोपन करणे व तिन वर्ष संवर्धन करणे. | १२२४६५३ | पात्र |
| ३ | विश्रामगृह पातूर ता. पातूर जि. अकोला येथे वृक्षारोपन करणे व तिन वर्ष संवर्धन करणे. | १२२४६५३ | पात्र |
| ४ | विश्रामगृह बार्शिटाकळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथे वृक्षारोपन करणे व तिन वर्ष संवर्धन करणे. | १२२४६५३ | पात्र |
| ५ | मौजे हाता ता. बाळापूर जि. अकोला येथे मरिमाता मंदिराजवळ सभागृहाचे बांधकाम करणे. | २१३६०३४ | सुबेअ |
| ६ | अकोला जिल्ह्यातील मौजे अंबाशी येथील शासकीय जागेत हनुमान मंदिराजवळ सभामंडप व घुमटचे बांधकाम करणे. | २०१६८५३ | मकासस |
| ७ | मौजे भौरद येथील ग्राम पंचायतच्या खुल्या जागेत हनुमान मंदीर जवळ सभामंडपाचे बांधकाम करणे | १६५३१७० | मकासस |
| ८ | मौजे पारांडा येथील ग्रामपंचायत जागेवर सोपिनाथ महाराज मंदिराजवळ सभामंडपाचे बांधकाम करणे. | १६६१०६६ | मकासस |

**अटी व शर्ती : -**

१) सर्व पात्र/इच्छूक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२ ई-निविदा काम क्र. १ ते ८ कामांची ई-निविदा दिनांक ०२.०१.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक ०९.०१.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक १२.०९.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे )
३) वरील काम क्र. १ ते ८ कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील
४) खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in
५) ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
६) वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही.
७) ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

(प्रसाद पाटील)
कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग अकोला

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


# यवतमाळ नगराध्यक्षपदी ॲड.प्रियदर्शनी उईके विराजमान

## 100 दिवसांच्या आराखड्यानुसार विकासात्मक उपक्रम राबविणार

प्रतिनिधी २ जानेवारी



**यवतमाळ** : नगरपरिषदेच्या अध्यक्षपदी ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी अधिकृतरित्या पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या पुढील कार्यकाळातील प्राधान्यक्रमांची माहिती दिली.

यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या 100 दिवसांच्या आराखड्यानुसार यवतमाळ नगरपरिषदेत प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. नगरपरिषदेचे संकेतस्थळ अद्यावत करण्यात येणार असून नागरिकांना कर भरण्यासाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच कौशल्य विकासासाठी कर्ज सुविधा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण व्हावे यासाठी तक्रार निवारण केंद्र पूर्णतः ऑनलाईन करण्यात येणार असून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर विशेष लक्ष दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# दुचाकी अपघातात तरुण ठार

प्रतिनिधी २ जानेवारी





**झरी-जामणी** : झरी-जामणी तालुक्यातील पाटणबोरी येथील रहिवासी राहुल अशोक बोगावार (वय ३०) यांचा गुरुवारी रात्री झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे पाटणबोरीसह झरी-जामणी परिसरात शोककळा पसरली आहे.

राहुल बोगावार हे झरी-जामणी येथे मोबाईल दुरुस्ती व इलेक्ट्रॉनिक वस्तू विक्रीचा व्यवसाय करीत होते. गुरुवारी रात्री सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास माथार्जुन–बोरी मार्गावर, सुमारे ९०० मीटर अंतरावर त्यांच्या दुचाकीला (क्रमांक MH 29 CH 6662) अपघात झाला. अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अमलदार रितेश वानखेडे, सचिन गाडगे, हेमंत कामतवार व अरविंद जाधव यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह शवविच्छेदनासाठी झरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत पोलीस अधिक तपास करीत असून, तरुणाच्या अकाली मृत्यूमुळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.

# ‘संवाद सेतू’मुळे कृषी विभाग थेट बांधावर

## सायखेड्यात शेतकऱ्यांशी मुक्त संवाद

प्रतिनिधी २ जानेवारी



**यवतमाळ** : राज्याचा कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यातील वर्षानुवर्षाचं नातं अधिक दृढ करण्यासाठी कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या संकल्पनेतून नव्या वर्षात ‘संवाद सेतू’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत कृषी अधिकारी आठवड्यातून दोन दिवस थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी मुक्त संवाद साधणार आहेत.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून नववर्षाच्या सुरुवातीलाच उपविभागीय कृषी अधिकारी, यवतमाळ जगन राठोड यांनी सायखेडा येथील शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन केले. पीक व्यवस्थापन, शाश्वत शेती, शासनाच्या योजनांची माहिती देत शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून त्यावर उपाय सुचविण्यात आले.

दरम्यान, कृषी विभागाच्या माध्यमातून प्रत्येक गावात लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू असून सायखेडा येथे वनराई बंधारा टाकण्यात आला. यामुळे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढीस मदत होणार आहे.

यावेळी तालुका कृषी अधिकारी मा. पूजा गवई, मंडळ कृषी अधिकारी प्रफुल मनवर, सहाय्यक कृषी अधिकारी हरीश रामटेके यांच्यासह शेतकरी राहुल चौधरी, आशिष लढे, शंकर मस्के, प्रज्योत लढे व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य फ्लोअरबॉल अजिंक्यपद स्पर्धेत यवतमाळ जिल्हाला ब्रांस मेडल

प्रतिनिधी २ जानेवारी




**यवतमाळ** : फ्लोअर बॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र अंतर्गत भंडारा जिल्हा फ्लोअर बॉल अजिंक्य पद स्पर्धा नुकतीच भंडारा येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल वर झाला. त्यात यवतमाळ जिल्हा फ्लोअर बॉल मुलांच्या गटातील तिसऱ्या क्रमांकसाठी यवतमाळ विरुद्ध गोदीया यांच्या दरम्यान झाला त्यात यवतमाळ जिल्हानी तीन -शून्य अशा गोलनी मात करीत कास्य पदक पटकाविले .या कौशल्यवंत संघात कर्णधार कार्तिक गायकवाड, ओम पाली, दर्शन चव्हाण, नेव्हील शुक्ला, अंश मडसे, अनिकेत पानसद, श्रेषथ माहुरे, आदित्य चौधरी, आयुष्य गायकवाड सह संघव्यस्थापक व प्रसिक्षक गजानन मुकणर आदीचा सहभाग होता.बक्षीस वितरण समारंभ सोहळाचे अध्यक्ष तथा फ्लोअर बॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे सचिव रविंद्र चौथवे, दिपक वाडे, भंडारा फ्लोअर बॉल असोसिएशन चे सचिव आदिच्या हस्ते करंडक व सहभागी खेळाडूंना ब्राँस मेडल बहाल करून गौरव करण्यात आला. या यशाचे श्रेय यवतमाळ जिल्हा फ्लोअर बॉल असोसिएशन चे अध्यक्ष अमोल बोदडे, उप्पाध्यक्ष मनोज येंडे, सचिव तथा क्रीडा मार्गदर्शन जितेंद्र सातपुते, सहसचिव सचिन भेंडे, आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू आकाश चिकटे,एम एन मिर, पियुष भुरचंडी, अविनाश लोखंडे, आनंद भुसारी, अजय मिरकुटे, जगदीश जागीड संजय कोल्हे, क्रीडा अधिकारी सचिन हरणे, प्रथमेश ठोकळ, विकी गिरी, खुशी गायकवाड आजी माजी फ्लोअरबॉल पटूनी विशेष गौरव करून सत्कार केला.

# भीमा कोरेगाव शौर्यदिनानिमित्त बाइक रॅली; शहीदांना मानवंदना

प्रतिनिधी २ जानेवारी





**यवतमाळ** : भीमा कोरेगाव येथे झालेल्या ऐतिहासिक लढाईला २०८ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, १ जानेवारी २०२६ रोजी यवतमाळ येथे शौर्यदिनानिमित्त भव्य बाइक रॅलीचे आयोजन करण्यात आले. संविधान चौक, यवतमाळ येथून रॅलीला सुरुवात झाली.

जातीयता नष्ट होऊन समता, न्याय व बंधुता नांदावी, या उद्देशाने झालेल्या ऐतिहासिक लढाईच्या स्मरणार्थ शहीद शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी मोठ्या संख्येने भीमसैनिकांनी या रॅलीत सहभाग नोंदविला.

रॅलीने यवतमाळ शहरातील विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत समतावादी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन केले. रॅलीचा समारोप पुन्हा संविधान चौक येथे करण्यात आला.

या बाइक रॅलीचे आयोजन प्रफुल शंभरकर, आनंद देवगडे, सचिन खाडे, सिद्धार्थ भवरे, ॲड. राहुल पाटील, रुपेश लोखंडे, राज सोनोने, अंकित घोसे, शैलेश तागडे, शैलेश गाडेकर, चंदू शेळके, प्रथमेश साखरे, इंजि. दीपक नगराळे, कवडूजी नगराळे, शंतनु देशभ्रतार, अंकुश पाटील, धिरज खोब्रागडे, विलास वानखेडे, सुरेंद्रभाऊ वाकोडे, अमर विहिरे, अक्षय कडसकर तसेच भीमा कोरेगाव शौर्यदिन बाइक रॅली आयोजन समिती, यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आले होते.

# नगराध्यक्ष तेजश्री जैन यांनी पदभार स्वीकारला

## भ्रष्टाचारमुक्त नगरपरिषद हा आमचा संकल्प : नंदकिशोर अग्रवाल

प्रतिनिधी २ जानेवारी



**उमरखेड** : मागील नऊ वर्षांपासून नगरपरिषदेत सुरू असलेल्या अनागोंदी व बेताल कारभाराला कंटाळून शहरवासीयांनी जनशक्ती पॅनलच्या माध्यमातून सत्तापरिवर्तन घडवून आणले. या परिवर्तनानंतर जनशक्ती पॅनलच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष तेजश्री जैन व १७ नगरसेवकांचा भव्य पदग्रहण सोहळा १ जानेवारी २०२६ रोजी नगरपरिषद प्रांगणात उत्साहात पार पडला. याच वेळी नगराध्यक्ष जैन यांनी अधिकृतरीत्या पदभार स्वीकारला.

सकाळी ११ वाजता जनशक्ती पॅनलच्या निशाणीने सजविलेल्या बसमधून नगराध्यक्ष तेजश्री जैन व नगरसेवकांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ काँग्रेस नेते नंदकिशोर अग्रवाल होते. यावेळी काँग्रेस नेते तातू देशमुख, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस साहेबराव कांबळे, राम देवसरकर, इनायतउल्ला जनाब, गोपाल अग्रवाल, बाळासाहेब नाईक, ॲड. बळीराम मुटकुळे, अजय नरवाडे, राजेश खामनेकर, प्रशांत पत्तेवार, सतीश नाईक, निलेश जैन, राजू कवाने, सुभाष दिवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात नंदकिशोर अग्रवाल म्हणाले, “नगरपरिषदेतील मागील नऊ वर्षांचा कारभार नागरिकांना मान्य नव्हता. त्यामुळेच जनतेने सत्तापरिवर्तनाचा कौल दिला. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक व लोकाभिमुख नगरपरिषद उभारण्याची मोठी जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे. यापुढे कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून कोणत्याही चुकीस थारा दिला जाणार नाही. जनहिताच्या चांगल्या कामांसाठी विरोधकांच्या सूचनांचाही स्वीकार करून शहराच्या आधुनिक विकासाला चालना दिली जाईल.” प्रदेश काँग्रेस सरचिटणीस साहेबराव कांबळे यांनी सांगितले की, शहरवासीयांनी निष्कलंक नेतृत्वावर विश्वास टाकला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच आचारसंहितेच्या काळात नियमबाह्य टेंडर काढल्याचा आरोप करत प्रशासनाने मग्रुरी सोडावी, अशी मागणी त्यांनी केली. माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती राम देवसरकर यांनी हे परिवर्तन शहरासह ग्रामीण भागातील जनतेच्या नाराजीचे फलित असून हा सर्वसामान्यांचा विजय असल्याचे सांगितले. तातू देशमुख, इनायतउल्ला जनाब, शेख तालीब व शगीर तन्ना यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात ॲड. संतोष जैन यांनी लोकशाही जिवंत ठेवणारा जनतेचा कौल सर्वमान्य असून जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला जाणार नाही, असे स्पष्ट केले. चांगल्या कामांसाठी विरोधकांचाही सहभाग व त्यांच्या सूचनांचा सन्मान केला जाईल, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात भाजपशी युती तोडून निवडणूक लढवलेल्या शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख ॲड. संजीवकुमार जाधव व त्यांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेमराव वानखेडे यांनी केले, तर आभार सिद्धेश्वर जगताप यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. पदभार स्वीकारल्यानंतर नगराध्यक्ष तेजश्री जैन यांनी नगरपरिषदेच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या, “शहरातील मतदारांनी दिलेल्या विश्वासास पात्र ठरत स्वच्छ, पारदर्शक आणि तत्पर कारभार राबविला जाईल. नागरिकांना वेळेत नागरी सुविधा उपलब्ध करून देत सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले जाईल.”

# पांढरकवडा नगर परिषदेत शिवसेना शिंदे गटाचे गटनेतेपदी आतिष चव्हाण



प्रतिनिधी २ जानेवारी

**पांढरकवडा** : पांढरकवडा नगर परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्षांसह सहा उमेदवार विजयी झाले, तर शिवसेना (शिंदे गट) व खेताणी फाऊंडेशनच्या १६ उमेदवारांनी बहुमताने विजय मिळवला. या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख व नगरसेवक आतिष तानाजी चव्हाण यांची नगर परिषद गटनेतेपदी निवड करण्यात आली.

ही निवड जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड तसेच खेताणी फाऊंडेशनचे प्रमुख सलीम खेताणी यांच्या आदेशानुसार करण्यात आली. शिवसेना जिल्हाप्रमुख (यवतमाळ) राजुदास जाधव यांनी याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे अधिकृत पत्र सादर केले. या निवडीमुळे शिवसेना शिंदे गट व खेताणी फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गोरगरीबांच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत राहणारे, लोकांच्या थेट संपर्कात असलेले आणि युवा वर्गात मजबूत पकड असलेले नेतृत्व म्हणून आतिष चव्हाण यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या गटनेतेपदी निवडीबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

# दुचाकी लंपास

प्रतिनिधी २ जानेवारी

**आर्णी** : शहरातील जुन्या कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात दुचाकी चोरीची घटना घडली आहे. तुफान हॉटेलसमोर उभी केलेली सी.डी. डिलक्स मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली.

याप्रकरणी श्रीराम बळीराम मंदेवाड (वय ३२, रा. शनी मंदिर चौक, आर्णी) यांनी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार १७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास त्यांनी आपली जुनी वापरती मोटारसायकल (क्र. एमएच २९ झेड ५०१४) हॉटेलसमोर उभी केली होती. सुमारे २० हजार रुपये किमतीची ही दुचाकी चोरीस गेली.

या प्रकरणी ३१ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# बौद्ध सांस्कृतिक इतिहासासाठी फुले-आंबेडकरांची चिकित्सक दृष्टी आवश्यक : महेंद्र शेगावकर

## ‘स्मृती पर्व २०२५’चा उत्साहात समारोप

प्रतिनिधी २ जानेवारी



**यवतमाळ** : आंबेडकरी साहित्य व कला अकादमीच्या वतीने आयोजित नऊ दिवसीय ‘स्मृती पर्व २०२५’ या वैचारिक-सांस्कृतिक महोत्सवाचा बुधवार (३१ डिसेंबर) रोजी उत्साहात समारोप झाला. समारोपीय सत्रात प्राचीन बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक महेंद्र शेगावकर (अकोला) यांनी “डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्धांचा सांस्कृतिक इतिहास” या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. बौद्ध संस्कृतीचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी अंगीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

बौद्ध तत्त्वज्ञान हे जागतिक दर्जाचे असून, इतर धर्मांतील अनेक प्रथा बौद्ध संस्कृतीतूनच विकसित झाल्याचे शेगावकर यांनी स्पष्ट केले. गाथा, थेरीगाथा, त्रिपिटक, त्रिशरण, पंचशील तसेच डॉ. आंबेडकरांच्या २२ प्रतिज्ञांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण मांडले. नव्या पिढीने या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून त्याचा प्रचार-प्रसार करण्यासाठी संघटित प्रयत्न उभारावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था), भंडारा शुद्धोधन कांबळे होते. सांस्कृतिक परिवर्तनासाठी आंबेडकरी विचारांची भूमिका नव्या पिढीने प्रभावीपणे निभावली पाहिजे, असे ते म्हणाले. यावेळी घनश्याम पाटील व संच यांनी आदरांजलीपर गीत सादर केले. कार्यक्रमाची भूमिका डॉ. सुभाष जमदाडे यांनी मांडली; परिचय गोपीचंद कांबळे यांनी करून दिला, तर संचलन सुनील वासनिक यांनी केले. प्रास्ताविक कडूजी नगराळे यांनी केले.

याप्रसंगी स्मृती पर्वाच्या संस्थापकांपैकी ॲड. आनंद गायकवाड, डॉ. नीरज वाघमारे आणि मीराताई वीर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. ज्ञानेश्वर गोरे आणि डॉ. विलास काळे यांनी समन्वयक व मुख्य आयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. समारोपाच्या दिवशी यवतमाळकरांची मोठी उपस्थिती लाभली.


## CHANGE IN NAME

My old name is Mohammad Ibrahim sheikh Wazir which now I am changing as new name Mahammad Ibrahim Sheikh wajir Henceforth my all correspondence will be done as per my new name. please considr the same sing by - Mahammad Ibrahim sheikh Wajir-Ward-4 Dhanki ta Umarkhed Dis Yavatmal

## CHANGE IN NAME

Ibrahim My old name is Ajija Begam Mohammad Ibrahim which now I am changing as new name Ajijabee Mahammad Ibrahim sheikh Henceforth my all correspondence will be done as par my new name please consider the same Sing by- Ajijabee Mahammad Ibrahim sheikh a.p. ward-4 Dhanki Ta. Umarkhed Dis. Yavatmal

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि. २ जानेवारी २०२६




# अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण, पोकरातील कारण, खऱ्या लाभार्थ्यांचे मरण...

# विहीर तुषारसंच आणि फळबाग वितरण !

## *शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे *रिसोड तालुक्यातील जनतेची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत ' पोकरा ' योजनेतून वितरित करण्यात आलेले अनुदान संबंधित कृषी सहायक आणि कृषी अधिकारी यांच्या भ्रष्ट धोरणातून स्वार्थापोटी वाटण्यात आले असल्याची खळबळजनक बाब आता उघड होत आहे. सदर योजनेत रिसोड तालुक्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून, या योजनेतील पोकरा भाग - १ मधील समाविष्ट असलेल्या अनेक गावातून आता तक्रारी पुढे येत आहेत.तर काही कृषी सहायकाच्या मनमानी कारभाराची चर्चा जिल्हाभर होत आहे.' अर्थ कारणातून ' काही मर्जीतील लोकांनाच नियमबाह्य अनुदानाची खिरापत वाटणाऱ्या सबंधित कर्मचारी व अधिकारी आणि बोगस लाभार्थ्यांची सखोल व कसून चौकशी करावी अशी मागणी जोर धरत आहे. ज्या कृषी सहायकानी व संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारला त्यांची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करावी अशी मागणी योजनेच्या लाभापासून वंचित ठेवलेले शेतकरी करीत आहेत.



## रिसोड तालुक्यात खळबळ...

### चौकशीचा अकोला पॅटर्न रबविण्याची गरज...

अकोला जिल्ह्यात पोकरा प्रकल्पातून वितरित करण्यात आलेल्या विविध योजनात मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यात प्रामुख्याने समूह गट व वैक्तिक लाभांच्या योजनांचा समावेश होता. सदर तक्रारींची चौकशी करण्यासाठी विभागीय कृषी सहसंचालकांनी वाशिम जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. शंकर तोटावार व इतर तिघांची समिती गठीत केली होती. या समितीने चौकशी अहवाल सहसंचालक कार्यालयास सादर करून ' पोकरा ' योजनेतील अनुदान वाटपबाबत संशय व्यक्त केला होता. त्यात प्रामुख्याने फळबाग, वनीकरण, विहिरी, शेडनेट, ट्रॅक्टर, अवजारे बँक, गोदाम आदी अनेक वाटप नियमबाह्य झाले असल्याचे निशपन्न झाले होते. परिणामी अकोला जिल्ह्यात एकाचवेळी चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र बरेच दिवस होऊनही संबंधित दोषींवर कुठलीही कारवाई झाली नसल्याचे वृत्त एका वृत्तपत्राने प्रकाशित केले होते. सदर वृत्ताची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई झाली होती. हा चौकशीचा पॅटर्न वाशिम जिल्ह्यात देखील राबवावा अशी मागणी होत असून रिसोड तालुक्यातील प्रकाराकडे जिल्हावासियांचे लक्ष वेधले जात आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील 'पोकरा' प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे.लवकरच तालुक्यातील मोप,लोणी, मोरगव्हाण, भर जहाँगीर व ईतर काही गावातील गैरप्रकारच्या तक्रारी वरिष्ठस्तरावर दाखल करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात आलेल्या ' पोकरा ' योजनेच्या पहिल्या टप्प्यात रिसोड तालुक्यातील १८ गावांचा समावेश करण्यात आला होता. सन २०१८ साली सुरु झालेल्या या पहिल्या भागात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याची पहिली तक्रार शेलुखडसे गावातून करण्यात आली आहे.सदर प्रकरणाची चौकशी सुरू असून झालेला भ्रष्टाचार दडपण्यासाठी आटोकाठ प्रयत्न केला जात असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे.मात्र फुकाचे शासकीय पैसे हडपणाऱ्यांनी कितीही पैसे मोजले तरी अखेर 'गैरव्यवहाराचे पितळ उघडे पडणारच' असे प्रशासकीय सेवेतील तज्ञ आणि वरिष्ठ अधिकारी बोलत आहेत.जिल्हाभर गाजत असलेल्या शेलुखडसे येथील या प्रकरणाने आता तालुक्यात खळबळ उडाली असून उद्यापासून अनेक तक्रारी दाखल होणार आहेत.यात अवजारे खरेदी, ठिंबक सिंचन, आणि वाकद व भर जहाँगीर येथून देण्यात आलेल्या साहित्यांची कसून चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. तसेच रिसोड येथील एका एजन्सीवरून वितरित करण्यात आलेले जीएसटी देयके व त्यावर दाखवण्यात आलेल्या साहित्यांची उत्पादन तिथी व तपासणीत आढळणाऱ्या प्रत्यक्ष वस्तूंची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे. कारण काही ठराविक गावात केवळ कागदोपत्री वितरण झाले असून काही दलालांनी यात चांगलाच हात मारला असल्याचे बोलले जात आहे.याबाबत एक सामाजिक बांधिलकी म्हणून काही सामाजिक कार्यकर्ते व भ्रष्टाचार विरोधी लोक पुढाकार घेणार आहेत.जागतिक बँक निधी उपलब्ध करून देणारी पोकरा ही पहिली योजना आहे.मात्र भ्रष्ट कर्मचारी, अधिकारी आणि दलालांनी या योजनेची वाट लावली असल्याचे वास्तव समोर येत आहे.शेलुखडसे येथील प्रकरणाची प्राथमिक चौकशी समाधानकारक झाली नाही तर या प्रकरणाची उच्चअधिकाऱ्यांकडून चौकशी होणार असल्याचे तक्रारदार यांनी म्हटले आहे.कारण या गावाचा तब्बल एक ते दिड वर्षांनी उशिरा समावेश करण्यात आला असल्याची माहिती येथील शेतकऱ्यांनी माहिती दिली आहे. त्यानंतर आलेल्या ' कोरोना ' महामारीत या योजनेत मोठ्या प्रमाणात सावळागोंधळ झाला असल्याची माहिती दाखल तक्रारीनंतर उजागर झाली आहे. जवळपास ८० टक्के शेतकऱ्यांच्या तोंडाला पान पुसले असल्याची धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर आता तालुकाभर एकच खळबळ उडाली असून त्या अनुषंगाने तक्रारी दाखल होणार आहेत.सदर तक्रारीत शेडनेट पासून विहिरी, अवजारे बँक, प्रक्रिया संस्था, गोदामे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाईप लाईन, कृषी यंत्र, ट्रॅक्टर व ईतर वैक्तिक लाभाच्या योजनांच्या नावाखाली शासकीय अनुदानाची जी खिरापत वाटली त्याची कसून चौकशी करावी अशी मागणी करण्यात येणार आहे.चौकशी पारदर्शक झाली तर लाखों रुपयांचा गैरप्रकार उघडकीस येईल असे बोलल्या जात आहे.यात एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांच्या नावावर वेगवेगळ्या घटकांचा लाभ देण्यात आला त्या घटकांची व देयकांची आणि बँक खात्याची सुद्धा चौकशी करण्याची गरज निर्माण होणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.कारण लाभार्थी यादी पडताळून पाहिल्यास एकाच व्यक्तीच्या नावावर एकाच घटकाचा डबल डबल लाभ देण्यात आला असल्याचे निष्पन्न होत आहे. ही नियमबाह्य बाब ' पोकरा ' योजनेच्या स्तुत्य हेतूला हरताळ फासणारी आहे. त्यामुळे शेलुखडसे येथील प्रकरणाची चौकशी होणे खुप गरजेचे आहे. असे तालुक्यातील शेतकरी बोलत आहेत. मात्र सदर चौकशी कार्यक्षेत्राबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच व्हावी उगाच चोराच्या हाती चाबी देऊन 'चोरी झालीच नाही ' असा फुकटचा आव सबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी आणू नये अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.तर सदर भ्रष्टाचार प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास योजनेपासून वंचित राहिलेले शेतकरी योग्य ठिकाणी न्याय मागणार असल्याचे बोलत आहेत. या बाबत अनेकांनी सिटीन्यूज सुपरफास्टशी संपर्क साधून पाठपुरावा करण्याची विनंती सुद्धा केली आहे.




## थोडक्यात

### शेतकऱ्यांनी २४ जानेवारी-पूर्वी ई-पिक पाहणी करावी

*अन्यथा विमा व अनुदानास अडचण
*जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी रब्बी हंगाम ई-पिक पाहणी (Digital Crop Survey ) उपक्रमाची सुरुवात १० डिसेंबर २०२५ पासून करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ वर पिक पेरा स्वतः मोबाईलद्वारे नोंदवणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर पिक पाहणी करण्याची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ असून, या कालावधीत नोंदणी न केल्यास पुढील लाभांवर परिणाम होणार आहे.

रब्बी हंगाम २०२५ अंतर्गत वाशिम जिल्ह्यात एकूण ३ लक्ष ६६ हजार १२३ स्वतःच्या शेतातील पिक पाहणी अपेक्षित असून, आजपर्यंत २४.५५ टक्के क्षेत्रावरच ई-पिक पाहणी नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित क्षेत्रासाठी सर्व शेतकरी बांधवांनी तातडीने ई-पिक पाहणी ॲपद्वारे पिकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.पिक पाहणीसाठी ई-पिक पाहणी व्हर्जन ४.०.५ हे मोबाईल ॲप आवश्यक असून, गुगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये ॲप इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन पिकांची नोंदणी करून माहिती ऑनलाईन अपलोड करणे अपेक्षित आहे. मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा वापरात अडचण असल्यास, संबंधित गावाचे ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल, कॉमन सर्व्हिस सेंटर तसेच रब्बी हंगाम ई पिक पाहणी साठी नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी.ई-पिक पाहणीद्वारे पिकांची नोंदणी न केल्यास ७/१२ वर पिक पेरा कोरा राहील, जो नंतर भरता येत नाही. परिणामी पिक विमा, शासकीय अनुदान व इतर लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होतील. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी अचूक ७/१२ पिक नोंद अनिवार्य असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## समृद्ध पंचायत राज अभियान, तीस रक्तदात्यांनी केले रक्तदान !



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील गणेशपूर/ पाचंबा येथे दि.३१ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या औचित्याने सदर शिबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सरपंच प्रतिनिधी विष्णु पाटील जाधव यांनी दिली असून वाशिम रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी रक्त संकलन केले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सदर शिबिरात तब्बल तीस रक्तदात्यांनी स्वच्छेने रक्तदान करून गावाचा नावलौकिक वाढविला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

ग्रामपंचायत गणेशपूर पाचंबा आणि वाशिम ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सरपंच प्रतिनिधी विष्णु पाटील जाधव यांनी या शिबिराचे महत्त्व ग्रामस्थांना पटवून दिले. सदर शिबिरात गणेशपूर आणि पाचंबा गावातील ज्येष्ठ नागरिक व युवा मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रेमचंद नरवाडे, कृषी सेनेचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील भोसले, ग्रामपंचायत सदस्य विजय मुटकुळे, सुनील शेगर, संतोष गव्हाणे, विजय जाधव, विजय भोसले, सुभाष भोसले, विलास भोसले, गोपाल जाधव, विठ्ठल जाधव, संजय भोपाळे, आदिनाथ मुटकुळे, बबलू भोसले, महादा चोपडे, अजय गव्हाणे, शंकर वानखेडे, श्रीराम देव्हारे, रुपचंद ताकतोडे, ज्ञानेश्वर भोपाळे, ग्रामविकास अधिकारी एम. डी. सदार, वाशिम रक्तपेढीचे कर्मचारी डॉ. अजय दहात्रे, अनिल सोळंके, अच्युत जाधव, नैना शिंगाडे, शुभांगी बिसने ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विष्णु जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याचा आम्ही संकल्प केला आहे. त्यासाठी आपण गावातील सर्व घरांना नळाद्वारे शुद्ध पाणी, सौर ऊर्जेचा वापर करून वीज बिल शून्यावर आणण्यासाठी विशेष भर देणार आहोत. पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण करून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित करणार आहोत. गावातील घनकचऱ्याचे व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून या अभियानाच्या निमित्ताने गणेशपूर/पाचंबा गट ग्रामपंचायतला जिल्ह्यातून प्रथम क्रमांकासह गुणांकन मिळविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करणार आहोत !

**सौ शोभा विजय जाधव**
सरपंच, गणेशपूर/ पाचंबा ता. रिसोड

## लाभार्थी व अधिकारी जगले, वृक्ष नाही लागले ...

# भ्रष्टाचाराची चतु:सूत्री, रोपवाटिका कागदोपपत्री !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रोजगार हमीच्या १०० कोटीच्या घोटाळ्यानंतरही मालेगाव तालुक्यातील घोटाळ्याचे सत्र थांबता थांबेना तालुक्यात रोजगार हमी अंतर्गत देण्यात आलेल्या रोपवाटीकाच कागदोपत्री असल्याचे सिध्द झाले आहे. रोपवाटीकेतील वृक्ष गायब असून त्यानंतर रोपवाटीकेतील वृक्षांवर राबविण्यात येणारी वृक्षारोपण योजना कुठे आहे साहेब असा प्रश्न पडला आहे. भ्रष्टाचारी दक्ष असले तरी त्यांनी काहीच न करता ४५ लक्ष रूपये काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

वाशीम तालुक्यात कागदोपत्री रोपवाटीका व न झालेल्या वृक्षारोपणवर कोट्यवधीचा घोटाळा सिटी न्युज सुपरफास्टने उघड केला होता. आता मालेगाव तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या चार रोपवाटिकांचे कुशलचे देयक काढण्यात आले असल्याचे माहिती आहे, सदर रोपवाटिका ह्या एसआयटी (विशेष चौकशी समिती) चौकशीत समाविष्ट होत्या, चौकशीने केलेल्या चौकशीमध्ये काही गंभीर बाबी समोर आल्याने सदर रोपवाटिकांचे देयक हे सन २०१८ पासून प्रलंबित होते, मात्र रोजगार हमी योजनेच्या घोटाळ्यात माहीर असलेल्या पंचायत समिती मालेगाव यांना यातूनही पर्याय काढून अस्तित्वात नसलेल्या व यासाठी चौकशीतगंभीर बाबी समोर आलेल्या रोपवाटिकांचे सुमारे ४५ लक्ष रुपये देयक काढले आहे, यामध्ये 'अर्ध्यात आम्ही अर्ध्यात तुम्ही' अशी डील झाल्याची माहिती समोर येत आहे, सदर डील ही रोहयो विभाग प.स.मालेगाव मधील 'दीपक' ने केल्याचे सिद्ध होत आहे, दीपक ने सदर प्रकरणात अर्थपूर्ण 'सावळा' गोंधळ घातल्याचे पुरावे सिटी न्यूज कडे आहेत, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश देऊन सदर घोटाळा बाहेर काढावा आणि दीपक चे कॉल डिटेल्स काढावे व चौकशी मध्ये दोषी आढळून येणाऱ्या बिडीओ व सीडीओ यांना तत्काळ निंलबित करावे अशी जनतेतून मागणी होत आहे.

### वाशीमनंतर मालेगावच्या रोपवाटीका गायब...

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने रोजगार हमी योजनेअंतर्गत वाशीम तालुक्यात १४ रोपवाटीका कागदोपत्री असल्याचे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्टने २०२२ मध्ये वृत्त मालिका प्रकाशित करून उघड केले होते. या भ्रष्टअधिकाऱ्याने चौकशी मॅनेज केली होती. जिओ टॅगवर रोपवाटीकेत एकही वृक्ष नसल्याचे पुरावे सिटी न्युज सुपरफास्टकडे उपलब्ध आहे. त्यानंतर यामधील भ्रष्ट तांत्रीक अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली. यावरून रोपवाटीकेसह इतरही विभागात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले. मालेगाव तालुक्यातही रोपवाटीका गायब झाल्याचा प्रकार उघडकिस आला आहे .रोपवाटीकेतीच वृक्ष गायब झाल्याने वृक्षारोपण कुठे झाले साहेब असा सवाल नागरिक करीत आहेत.







# अधिकारी आले, ओली पार्टी खाऊन गेले !


## कारंजा तालुक्यात झाडाची खुलेआम कत्तल व कटाई सुरूच

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा तालुक्यात झाडाची खुले आम कत्तल व मोठ्या प्रमाणावर आरा मशीन वर कटाई सुरू आहे. दोन-तीन दिवसाआधी अधिकारी तपासणीसाठी आले व ओली पार्टी खाऊन गेल्याची कारंजा शहरात जोरदार चर्चा आहे.

या व्यवसायाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर नियमांची पायमल्ली सुरू असतानाही संबंधित यंत्रणा मात्र डोळेझाक करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.तालुक्यात दोन सॉ मील पूर्णतः परवानगीविना खुलेआम सुरू आहेत,तर ज्यांच्याकडे अधिकृत परवाने आहेत ते देखील शासनाने ठरवून दिलेल्या अटींना हरताळ फासत असल्याचे चित्र आहे.नियमांनुसार सूर्यास्तानंतर आरा मशीन बंद ठेवणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मात्र रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत सुरू ठेवले जात आहेत.एवढेच नव्हे तर रात्री उशिरापर्यंत लाकूड कापणे,साठवणे आणि वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत.मात्र आश्चर्याची बाब म्हणजे वनविभागाचे अधिकारी या ठिकाणी फिरकूनही पाहत नाहीत.





या आरा मशीन वर नेमके कोणकोणत्या जातीचे लाकूड साठवले जाते,त्याची कायदेशीर नोंद आहे की नाही,याची आजपर्यंत एकदाही सखोल चौकशी करण्यात आली आहे का ? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.काही आरा मशीनवर तर लाकूड ठेवायला जागा उरलेली नाही,इतका साठा असूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने संशय अधिकच गडद होत आहे.इतक्या उघड उल्लंघनानंतरही वनविभागाची भूमिका पूर्णतः संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.बेकायदेशीर आरा मशीन वर कारवाई का होत नाही ?

रात्री सुरू असलेले स्वामी अधिकाऱ्यांना दिसत नाहीत का ? की मुद्दाम दुर्लक्ष केले जात आहे ?हे प्रश्न आता सामान्य नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि शेतकरी वर्गातून जोर धरू लागले आहेत.जर वेळेत कठोर पावले उचलली नाहीत,तर कारंजा तालुक्यातील पर्यावरणाचा समतोल बिघडून धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी यावर वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का

# कारंजा न.प गटनेतेपदी एआयएमआयचे बिलाल पुंजानी

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●




कारंजा नगर परिषदेत एआईएमआई पक्षाच्या नगरसेवकांची बैठक नुकतीच पार पडली.या बैठकीत नगर पालिकेच्या गटनेतेपदी बिलाल पुंजानी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस एआईएमआई पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मो.युसुफ पुंजानी अध्यक्षस्थानी होते.

यावेळी नगराध्यक्षा फरीदाबानू मो.शफी पुंजानी या प्रमुख उपस्थित होत्या. तसेच पक्षाचे सर्व माननीय नगरसेवक उपस्थित होते. नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ नंतर नगर परिषदेत एआईएमआई पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी व कामकाजात एकसूत्रता राखण्यासाठी गटनेतेपदाची निवड करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवनियुक्त गटनेते बिलाल पुंजानी हे पक्षाचे सक्रिय व निष्ठावान कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. नागरी समस्या,विकासकामे, पाणीपुरवठा, स्वच्छता व मूलभूत सुविधांबाबत त्यांनी यापूर्वीही सातत्याने भूमिका मांडली आहे. निवडीनंतर बोलताना बिलाल पुंजानी यांनी पक्ष नेतृत्व व सर्व नगरसेवकांचे आभार मानले.नगरातील जनतेचे प्रश्न प्राधान्याने मांडून विकासकामांना गती देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.या निवडीमुळे नगर परिषदेत एआईएमआई पक्षअधिक संघटितपणे कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# आचारसंहितेमुळे लोकशाहीदिन नाही

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी व आचार संहिता सुरु असल्यामुळे याचा फटका लोकशाही दिनाला बसला आहे.

महापालिका क्षेत्रात निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने जिल्हास्तरीय लोकशाहीदिन होणार नाही.

आचारसंहिता संपेपर्यंत लोकशाहीदिन आयोजित करता येणार नाही, याची नोंद संबंधितांनी घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी केले आहे.

# महानगरपालिकेचे चित्र आज होणार स्पष्ट

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षच नव्हे, तर काँग्रेस आणि शिंदेसेनेतही तिकीट वाटपामुळे नाराजीचा सूर तीव्र झाला आहे. अनेक माजी नगरसेवक, पदाधिकारी व इच्छुकांना डच्चू देण्यात आल्याने असंतोष उघडपणे समोर आला आहे. विशेष म्हणजे, काही प्रभागांत अवघ्या आठ-दहा दिवसांपूर्वी पक्षात आलेल्या चेहऱ्यांना उमेदवारी दिल्याने नाराज होऊन काहींनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. आता बंडोबा' उमेदवारी मागे घेतात, की कायम ठेवतात, हे चित्र शुक्रवारी स्पष्ट होणार आहे. भाजपने माजी महापौर सुमनताई गावंडे यांना प्रभाग क्रमांक २० मधून उमेदवारी नाकारल्यानंतर, त्यांनी अपक्ष म्हणून रिंगणात उडी घेतली आहे. भाजपचे माजी नगरसेवक गोपी ठाकरे आणि आशिष पवित्रकार हेदेखील अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उतरले आहेत. भाजपकडून बरीच वर्षे नगरसेवक राहिलेले विजय इंगळे, तसेच भाजपच्या माजी नगरसेविका सारिका जयस्वाल यांनाही तिकीट न मिळाल्याने त्या दोघांनीही उद्धवसेनेची वाट धरली आहे. काँग्रेसमध्येही वेगळे चित्र नाही. माजी महापौर सुरेश पाटील यांना काँग्रेसने प्रभाग क्रमांक ६ मधून तिकीट नाकारल्याने, त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे.

## नाराजांनी घेतली शिंदे सेनेकडे धाव

शिंदेसेनेने इतर पक्षांतील अनेक नाराजांना थारा दिला आहे. पण शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनाच उमेदवारी नाकारल्याने तेदेखील नाराजांच्या कंपूत सहभागी झाले आहेत. भाजपच्या माजी नगरसेविका मंगला म्हैसने या उद्धवसेनेकडून रिंगणात उतरल्या आहेत. दुसरीकडे, उद्धवसेनेच्या शहर महिला आघाडी प्रमुख व माजी नगरसेविका मंजूषा शेळके यांनी ऐनवेळी भाजपात प्रवेश करून उमेदवारी मिळवली. पक्षांतरांमुळे निवडणूक अधिकच रंगतदार बनली आहे.

## भाजपला शिंदे सेनेचे आव्हान

एकसंध शिवसेनेने गेल्या निवडणुकीत स्वबळावर ८ जागा जिंकल्या होत्या. यंदा भाजपसोबत युती न होऊ शकल्याने शिंदेसेनेने स्वबळावर ७४ उमेदवार उभे करून भाजपला थेट आव्हान दिले आहे. एकसंध राष्ट्रवादी काँग्रेस ३ पक्षाला गेल्या वेळी पाच जागांवर विजय मिळाला होता. यावेळी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष भाजपसोबत युती करून १४ जागा लढवत आहे, तर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष काँग्रेससोबत आघाडी करून २५ जागांवर लढत देणार आहे.

## आज कोणाची माघार, कोण कायम राहणार?

तिकीट वाटपाने राजकारण ढवळून निघाले असून, बंडखोरी, पक्षांतर आणि अपक्षांची गर्दी, हीच निवडणुकीची ओळख ठरण्याची चिन्हे आहेत. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशीच्या चित्राकडे आता लक्ष लागले आहे.

## पिता-पुत्र रिंगणात!

सुरेश पाटील यांचा पुत्र चेतन पाटील यांनी उद्धवसेनेकडून अर्ज भरला आहे. युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आकाश कवडे यांना डावलण्यात आल्याने, त्यांनीही उद्धवसेनेची उमेदवारी स्वीकारली.

# महानगरपालिका निवडणुकीतून 16 उमेदवारांची माघार

## ◆ माजी उपमहापौरांसह उद्धवसेनेच्या तिघांची माघार

प्रतिनिधी २ जानेवारी




**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीतील ६ झोनमधील १६ उमेदवारांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज मागे घेतले. झोन क्रमांक १ मधून एकाही उमेदवाराने अर्ज मागे घेतलेला नाही. झोन क्रमांक २ मधून एकूण पाच उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले असून, त्यामध्ये उमेश हिरालाल श्रीवास्तव (प्रभाग क्र. ३ क), उद्धवसेनेच्या चोपडे मंगला प्रवीण (प्रभाग क्र. ४ अ), जया नरेंद्र दिंडोकार (प्रभाग क्र. ४ ब), उद्धवसेनेचे चेतन जळमकार (प्रभाग क्र. ५ ड) आणि भाजपचे माजी उपमहापौर राजेंद्र आनंद गिरी (प्रभाग क्र. ६ ब) यांचा समावेश आहे. झोन क्रमांक ३ मधून पाच उमेदवारांनी माघार घेतली असून, त्यामध्ये सरिता सोळंके (प्रभाग क्र. १७अ), राहुल वानखडे (प्रभाग क्र. ४ अ), नीलेश वानखडे (प्रभाग क्र.१० ड), शरजील अनस अहमद हसन (प्रभाग क्र. ९ ड) आणि शाहिस्ता परवीन जावेद रहमान खान (प्रभाग क्र. ८ क) यांचा समावेश आहे. झोन क्रमांक ४ मधून शेख ईब्राहिम शेख कासम (प्रभाग क्र. ११ अ) यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. झोन क्रमांक ५ मधून मुरूमकार वैभव जगदीश, अंजली देशमुख आणि मुरमकार पूजा कपिल यांनी माघार घेतली आहे. तसेच झोन क्रमांक ६ मधून पंकज पळसपगार (प्रभाग क्र. १९ अ) आणि पवार दिनेश प्रल्हाद (प्रभाग क्र. १९ ब) यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले.

# इलेक्शनच्या तोंडावर प्रभागातील विकास कामे

## महापालिका प्रशासनाचे, निवडणुक अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष का महापालिका प्रशासन दबावाखाली काम तर करत नाही ना

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** निवडणुकीच्या तोंडावर प्रभागांमध्ये होणारी विकासकामे, त्याकडे प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष आणि प्रशासनावरील दबाव हे प्रश्न लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. सामान्य नागरिकांच्या मनात याबद्दल शंका असणे स्वाभाविक आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जास्तीत जास्त कामांना मंजुरी मिळवणे आणि त्यांचे भूमिपूजन करणे हा राजकीय रणनीतीचा भाग असतो. आर्थिक वर्षाचा अखेरचा टप्पा किंवा टर्म संपण्यापूर्वी शिल्लक निधी खर्च करण्यासाठी कामांची घाई केली जाते आहे.

**'आम्ही काम केले आहे'**

हे दाखवण्यासाठी रस्त्यांचे डांबरीकरण, पेव्हिंग ब्लॉक्स किंवा सुशोभीकरणाची कामे वेगाने हाती घेतली जातात. प्रशासकीय यंत्रणेवर अनेकदा कामाचा मोठा ताण असतो, पण काही वेळा इतरही कारणे असू शकतात. जोपर्यंत आचारसंहिता अधिकृतपणे लागू होत नाही, तोपर्यंत कामांना मंजुरी देणे बेकायदेशीर नसते. निवडणूक अधिकारी केवळ आचारसंहिता लागू झाल्यावरच कडक पावले उचलू शकतात.

एकाच वेळी संपूर्ण शहरात शेकडो कामे सुरू असल्याने प्रत्येक कामाच्या दर्जावर लक्ष ठेवणे प्रशासनाला कठीण जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सत्ताधारी पक्षाचा किंवा प्रभावशाली नेत्यांचा दबाव असू शकतो. कामाच्या फाईल्स वेगाने पुढे नेण्यासाठी मौखिक आदेश दिले जातात. महापालिका आयुक्त आणि संबंधित विभागाला टॅग करून फोटोसह तक्रार मांडल्यास प्रशासनाला दखल घ्यावी लागते. विकासकामे होणे हे शहरासाठी चांगलेच आहे, परंतु ती केवळ निवडणुकीपुरती नसावीत आणि त्यांचा दर्जा उत्तम असावा, ही नागरिकांची रास्त अपेक्षा आहे.

# रॅली, विविध स्पर्धा द्वारे मतदार जनजागृती

## महानगरपालिकेच्या विविध शाळांचा सहभाग

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृती रॅली, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.





शिवसेना वसाहत परिसरात मतदार जनजागृतीसाठी मनपा मराठी मुलांची शाळा क्रं. २६ च्या विद्यार्थ्यांची भव्य रॅली काढण्यात आली. मनपा उर्दू मुलांची वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा क्रं. ८ लक्कडगंज येथे मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली, तसेच मनपा उर्दू शाळा क्र. ६, अकोट फाईल येथील विद्यार्थ्यांनीही मतदार जनजागृती रॅलीत सहभाग नोंदविला, तसेच मनपा मराठी मुलांची शाळा क्र. ९, काळा मारोती येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १९, हरिहर पेठ, अकोला येथेही चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मनपा हिंदी बालक शाळा क्र. २, अकोट फाईल येथे जनजागृती रॅली व चित्रकला स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १६, आदर्श कॉलनी येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

मनपा मराठी मुलांची शाळा क्रं १४ सिंधी कॅम्प तेथे रांगोळी स्पर्धा, मनपा सिंधी हिंदी बालक शाळा क्रं १ चित्र कला स्पर्धा याशिवाय इतरही अनेक शाळांमध्ये मतदार जनजागृतीविषयक विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहे. काही शाळांमध्ये जनजागृती नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

# शहरात 48 तासात दुसरी हत्या

## ◆ पोलिसांनी अर्ध्या तासात आरोपीला घेतले ताब्यात

प्रतिनिधी २ जानेवारी



**अकोला :** ०२ जानेवारी रोजी मोठी उमरी संजय नगरात अमोल डिगांबर पवार या ३५ वर्षीय युवकाची हत्या झाली. सुरज भगेवार यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. त्यावरून तपास करून अवघ्या अर्ध्या तासात आरोपीला अटक केली. मित्रानेच मित्राचा काटा काढला.

सिव्हिल लाइन्स पोलिसांना माहिती मिळाली की, नितेश अरुण जंजाळ वय ३८ वर्षे व मृतक अमोल डिगांबर पवार दोन्ही रा. संजय नगर मोठी उमरी अकोला हे चांगले मित्र असुन नेहमी सोबत राहतात. त्यांच्यामध्ये ०१/०१/२५ रोजी भांडण झाले. त्यातून हत्या झाली असावी. आरोपी नितेश जंजाळ याच्या घरी जावुन पाहिले असता आरोपी तेथे नव्हता. परंतु तपास करून अर्ध्या तासाच्या आत आरोपी नितेशला ताब्यात घेतले. त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. असुन गुन्हा दाखल करण्यी प्रक्रीया सुरू आहे.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हिल लाइन्स पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक मालती कायटे यांचे नेतृत्वात पोहेकॉ आशिष खंडारे, पोहकॉ संतोष बागळे, शक्ती कांबळे, प्रदीप पवार यांनी कारवाई केली.

# शालेय राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत स्वराली ठाकरेची निवड

प्रतिनिधी २ जानेवारी

**अकोला :** जिल्हा क्रीडा अधिकारी अकोलाच्या वतीने आयोजित १४ वर्ष शालेय राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धा २३ ते २५ डिसेंबर दरम्यान जसनगरा पब्लिक स्कूल रिधोरा येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये स्थानिक स्कूल ऑफ स्कॉलर्स हिंगणा रोड कौलखेड १४ मुली वर्षातील मुली संघ सहभाग झाला. या स्पर्धेतून स्वराली ठाकरे हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघाने स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. तसेच संघामधून स्वराली ठाकरे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले शालेय १४ वर्ष मुलीच्या महाराष्ट्राच्या बेसबॉल संघ निवड करण्यात आली. तसेच महाराष्ट्राचा १४ वर्ष आतील मुली बेसबॉल संघ जानेवारी २०२५ दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धा कु. स्वराली अमोल ठाकरे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्वराली मिळवलेल्या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ मनीषा उंबरकर उपमुख्याध्यापिका सौ. कोमल लहरिया सुमित बोकाडे, नयना मोडक, सौ मनप्रीत जडेजा, भारती पाटणकर यांनी कौतुक केले. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय रामेश्वर राठोड (बेसबॉल कोच व एन. आय. एस. शारीरिक शिक्षक) शारीरिक शिक्षक, विभाग प्रमुख राजेंद्र डोंगरे व आई-वडील व वर्ग शिक्षकांना देते.

# शेगाव संत नगरी भाविकांनी फुलली

प्रतिनिधी २ जानेवारी





**खामगाव :** विदर्भाच्या पंढरीत नवीन वर्षारंभी अडीच लाखाहून भाविकांनी श्रींचे समाधीचे दर्शन घेऊन नविन वर्षाची सुरुवात श्रींच्या कृपा आशिर्वादाने केली आहे तर दि.३१ डिसेंबर एकादशी व दि.१ जानेवारी गुरुवार या दोन्ही दिवसांत १ लाखाचे वर भाविकांनी श्रींच्या महाप्रसादाचा लाभ घेऊन धन्य झाले आहेत. शहरातील लहान मोठ्या व्यवसायिकांचे चांगलाच उलाढाल झाला आहे

सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी विदर्भाची पंढरी असलेल्या संत नगरी शेगाव येथे दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने व पुत्रदा एकादशी निमित्त जवळपास ८० हजाराहुन अधिक भाविकांनी श्रींचे चरणी नतमस्तक झालेत. तर हजारो भाविक नवीन वर्षाच्या स्वागत करण्यासाठी सायंकाळी संत नगरीत दाखल झाले होते

विदर्भाची प्रति पंढरी व महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या संत नगरी शेगाव येथे नविन वर्षाची सुरुवात श्री संत गजानन महाराजांच्या श्री दर्शनाने करण्याच्या उद्देशाने श्री संत गजानन महाराज मंदिर मध्ये दर्शन घेण्यासाठी गर्दी करणे सुरू केल्याने विदर्भ मराठवाडा कोकण मुंबई पश्चिम महाराष्ट्र इत्यादी भागातील जवळपास दोन दिवसात साडेतीन लाख भाविक संत नगरीत दाखल झाले होते.

श्रींच्या समाधी दर्शनाने नवीन वर्षाची सुरुवात असंख्य भाविक भक्तांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या नवीन वर्षाची सुरुवात श्रींच्या आशीर्वादाने केली आहे. त्याचप्रमाणे श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अनेक भाविक भक्तांनी केले. श्रींच्या समाधी दर्शनासाठी सुमारे ५:३० तास, श्रीमुख दर्शनासाठी ५५ मिनिटे वेळ लागत आहे. श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेण्यासाठी भाविक दर्शन बारीत शिस्तबद्ध पद्धतीने रांगेत लागून श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. श्रींच्या समाधी मूर्तीचे दर्शन घेऊन भाविकांनी श्री राम मंदिरात श्रीराम लक्ष्मण माता सीता व हनुमंताचे दर्शन घेतले जवळपास एकादशी व गुरुवार असे दोन्ही दिवसांत १लाखाचे वर भाविकांनी महाप्रसादाचा सुद्धा लाभ घेतला .श्री मंदिर परिसरात झालेल्या गर्दीमुळे कोणत्याही भाविकांना श्रींचे दर्शन घेण्यास असुविधा होऊ नये व त्यांना योग्य प्रकारे श्रींचे दर्शन घेता यावे याकरिता मंदिर परिसरात ठिकठिकाणी शेकडो सेवाधारी आपली सेवा दिली आहे . भाविक भक्तांचे वाहनांसाठी श्री संस्थानचे नि:शुल्क वाहन पार्किंगचा लाभ भक्त घेत आहेत. तर शहरातील सर्व खाजगी वाहन पार्किंग सुद्धा हाऊस फुल्ल झाले आहे तर प्रमुख मार्गावर सुद्धा वाहणे उभे आहे

दि.१ जानेवारी २०२६ वार गुरुवार रोजी श्रींच्या मंदिरात आज पहाटे काकड आरती , सकाळी ७ व ११ वाजता आरती झाली, दुपारी ४ ते ५ प्रवचन झाले, हरिपाठ, सायंकाळी श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघाली. सायंकाळी आरती, तर रात्री ८ ते १० श्री ह.भ.प. मोहणबुवा गोंडचवर मु. खरप जि. अकोला यांचे श्रीहरी कीर्तन झाले.

**भजनी दिंड्यांचे आगमन ..**

जय गजानन श्री गजानन, ज्ञानोबा तुकाराम, जय जय विठ्ठल रखुमाई नामघोष करीत भजनी दिडयाचे सुद्धा आगमन झाल्याने शहरातील परिसर भक्तीमय झाला आहे. गुरुवार रोजी श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना श्रींच्या समाधी व श्रीमुख दर्शन घेऊन बाहेर येणाऱ्या भाविकांना श्रींचा लाडू प्रसाद देण्यात आला आहे. श्री गजानन महाराज संस्थान च्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल भाविकांकडून प्रशंसा.

**श्री क्षेत्र नागझरी येथे भाविकांची गर्दी**

शेगांव पासुन ७ कि.मी अंतरावरील असलेल्या श्री संत गोमाजी महाराज संस्थान नागझरी येथे सुद्धा भाविकांनी श्री संत गोमाजी महाराज दर्शनासाठी गर्दी झाली आहे. या ठिकाणी श्री गोमाजी महाराज संस्थानच्या वतीने सकाळी ११ ते १२ या वेळेत हजारो भाविकांनी महाप्रसाद लाभ घेतला आहे.

# अकोला पोलीस दलातर्फे 'पोलीस वर्धापन दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी २ जानेवारी



## ◆ भव्य शस्त्र प्रदर्शन व जनजागृती सप्ताहाचे आयोजन



**अकोला :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याला प्रत्यक्ष कृतीत उतरवत अकोला पोलीस दलातर्फे २ जानेवारी २०२६ रोजी 'महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने अकोला पोलीस प्रशासनाने नागरिक व विद्यार्थ्यांसाठी 'भव्य शस्त्र प्रदर्शन व जनजागृती सप्ताह'चे आयोजन केले असून, या उपक्रमाला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पोलीस लॉन, अकोला येथे आयोजित या प्रदर्शनीत सर्वसामान्य नागरिकांना पोलीस दलाच्या दैनंदिन कार्यपद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान व विशेष पथकांची कार्यक्षमता जवळून अनुभवता येत आहे.अकोला पोलीस दलाचा हा लोकाभिमुख व सक्षम उपक्रम शहरात सकारात्मक चर्चेचा विषय ठरत असून, पहिल्याच दिवसापासून नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे.

**प्रदर्शनीतील प्रमुख आकर्षणे :**

शस्त्र व तंत्रज्ञान दालन : आधुनिक शस्त्रसज्जता, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच बिनतारी संदेश यंत्रणेचे थेट प्रात्यक्षिक. सायबर व महिला सुरक्षा : सायबर गुन्हेगारीविरोधातील जनजागृती, महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत 'दमिनी पथक' व 'भरोसा सेल'ची सविस्तर माहिती.

वाहतूक जनजागृती : वाहतूक नियमांचे पालन व अपघात प्रतिबंधाबाबत विशेष मार्गदर्शन.

**विशेष पथके :** डॉग स्क्वॉडची कार्यपद्धती आणि फिंगरप्रिंट युनिटच्या वैज्ञानिक तपास पद्धतींचे सादरीकरण.

जनसंवाद उपक्रम : 'सेल्फी विथ पोलीस' आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी थेट संवादाची अनोखी संधी.

**विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम**

पोलीस दलाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा व खाकी वर्दीप्रती आदर वाढावा, यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला स्पर्धा व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. सहभागी शाळा व सामाजिक संस्थांना पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. 'पोलीस आणि जनता यांच्यातील समन्वय अधिक दृढ करणे तसेच नागरिकांना सुरक्षिततेच्या आधुनिक उपाययोजनांची माहिती देणे, हा या जनजागृती सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. अकोल्यातील अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमाला भेट द्यावी,' असे आवाहन अकोला पोलीस प्रशासनाने केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK